कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




• पुणे • वर्ष १३ वे • अंक ४ था • जानेवारी-मार्च २०१७ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-



# BRINGING KONKAN TO YOU




Our expertise in creating premium quality residences at prime locations is now moving to Urawade, Pirangut.

Offering 1 & 2 BHK Quality Residences, a community well-connected to IT, industrial and city destinations.

Experience 'resort living' now in Pune!

## COMING SOON

A JV PROJECT BY

PANDIT JAVDEKAR | ATB PROPERTIES

CALL 99210 30392 | 95450 94355

OFFICE ADDRESS: Krishnakunj Apartments, Bharti Niwas Chowk, off Income Tax Lane, 64/31, Erandwane, Pune 411 004

P: +91 20 2545 8334 / +91 20 2545 7217 | E: sales@panditjavdekar.com | w: panditjavdekar.com | /PanditJavdekar

SITE ADDRESS: Gat No.: 308 & 310, Village Urawade, Tal. Mulshi, Dist. Pune 412 108

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ ॐ स्थापना १९९१

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष १३ वे | जानेवारी-मार्च २०१७ | अंक ४ था

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संपादक मंडळ

मुख्य संपादक :
श्री. श्रीगजानन गुर्जर
पुणे ९९७०१७४८१८ / ८८०६३९५८८० (WhatsApp)

शहर प्रतिनिधी
श्री. प्रसाद पंडीत गिरगांव, मुंबई, ९८६९१५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली, ९८३३१६३६५९
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. गोपाळ भाटवडेकर, पुणे, ९८५०९७९७०६
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९८८७२०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये, आजगांव, जि. सिंधुदूर्ग, ९४२३८८०१३८
श्री. गजानन साईनेकर, गोवा, ९९२३७९९६९७

ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३ / मो. ८१४९९०७७८९
email : bkbmsindia@gmail.com

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - श्री. श्रीगजानन गुर्जर

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रु. १००/- (रुपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी (शक्यतोवर तीन वर्षासाठी रु. ३००/- किंवा ५ वर्षासाठी रु. ५००/- भरल्यास सोईचे होईल). शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करुन वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५५२१०११०००४००८ वर कर्वेनगर, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000552. कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक : श्रीगजानन गुर्जर**

### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पूर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |
| पृष्ठदान | १००/- | - |

**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे - ४११ ०३०
**संपादक :** श्री. श्रीगजानन गुर्जर
**मुद्रक :** श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

संपर्क

# अनुक्रमणिका


- श्रीभागवत सुभाषित – लक्ष्मीकांत जोशी ४
- वेदाभ्यास. . . ५
- दान – सौ. वैशाली हर्डीकर ७
- पौष महिना शुभ की अशुभ ८
- गुरुमाहात्म्य ११
- गर्वहरण – सुहास खानवलकर १२
- ज्ञानेश्वरीचि वैज्ञानिकता १३
- टाचणी – कविता – प्रदीप पु. सातवळेकर १४
- पुणे मनपाचे 'घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प' पारितोषिक सौ. अनिता तांबे यांना प्रदान १५
- सुंदर बोधकथा १६
- संस्थावृत्त
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २१
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे २२
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक २३
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई २३
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे २४
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर २५
  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, रत्नागिरी २६
- आवळ्याची चटकदार टिकाऊ चटणी – रुचकर पाककृती २९
- अशी ही जगन्नाथाची गाथा – सौ. वीणा प्रदीप नाटेकर ३३
- न्यूनगंड – पुनरावलोकन ३४


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय



वर्षाभिनंदन,

आपणा सर्वांना नव्या वर्षाच्या तसेच वर्षारंभी जानेवारी महिन्यात येणाऱ्या **'मकर संक्रांती'**च्या अनेकानेक शुभेच्छा.

नुकत्याच झालेल्या कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या कार्यकारिणीच्या सभेत क. ब्रा. संघ, डोंबिवलीचे श्री. वासुदेव रायकर यांनी 'संपर्क' त्रैमासिकासाठी 'पृष्ठदाना'ची संकल्पना मांडली. ती आम्ही सर्वांनी उचलून धरली आणि सर्वांनी मान्य केल्याप्रमाणे संपर्कच्या अंकात एका पृष्ठावर खालच्या ओळीवर पृष्ठदानकर्त्याचे नाव व मोबाईल नंबरसह शुभेच्छा देण्याचे ठरले. यासाठी केवळ रु. १०० हे मूल्य; फक्त एकाच त्रैमासिकासाठी घेण्याचे सर्वानुमते मान्य झाल्यावर त्याच सभेत बघता-बघता आम्ही पंधरा पानांचे 'पृष्ठदान' निश्चित केले. आपल्यापैकी ज्यांना ही कल्पना आवडली असेल/रुचली असेल; त्यांनी यासाठी जरूर सहकार्य करावे. याबाबत ते आमच्याशी किंवा संघाच्या प्रतिनिधींशी संपर्क साधू शकतात.


'संपर्क' त्रैमासिकात आपण आपले विचारधन लेख स्वरूपात तसेच स्वरचित कविता, चुटकुले, रेसिपी, प्रवासवर्णन, संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सविस्तर वृत्त, फोटो वगैरे साहित्यरूपात पाठवू शकता. त्यास योग्य ती प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न आम्ही करतो. या निमित्ताने सर्वांसाठी हे एक व्यासपीठ निर्माण झाले आहे.


'संपर्क'चा प्रसार होण्याच्या दृष्टीने संघांतील सर्व सभासदांना विनंती की- आपल्या ओळखीतील, नात्यातील जे ज्ञातिबांधव, सभासद अजून 'संपर्क'चे वर्गणीदार झालेले नसतील; अशांना माहिती देऊन वर्गणीदार सभासद होण्याची विनंती करावी.

आमच्या सर्व वर्गणीदार सभासदांना, जाहिरातदारांना आणि हितचिंतकांना नवे वर्ष २०१७, तसेच जानेवारी महिन्यात येणाऱ्या मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा! तिळ आणि गुळ यामध्ये असलेल्या स्नेहाप्रमाणे आपल्या ज्ञातिबांधवामधील बंधुभाव आणि सौहार्द वृद्धिंगत होवो.

*Happy, Healthy and Prosperous New Year- 2017.*

श्रीगजानन गुर्जर
संपादक





## ।। श्रीराम समर्थ ।।
## श्रीभागवत सुभाषित

**येनोपसृष्टात्पुरुषाल्लोक उद्विजते भृशम् ।**
**न बुधस्तद्वशं गच्छेदिच्छन्न भयात्मन: ।।**

(श्रीमद् भागवत ४/११/३२)

**भावार्थ :**

क्रोधाधीन पुरुषाचे सर्वांना मोठे भय वाटते. म्हणून जो बुद्धिमान पुरुष असे इच्छितो की, आपल्यापासून कोणत्याही प्राण्याला भय असू नये आणि स्वत:लाही कोणापासून भय असू नये ; त्याने क्रोधाच्या अधीन कधीच होऊ नये.

स्वायंभुव मनूंनी आपला नातू ध्रुव याला उपदेश करताना 'क्रोध का नसावा, त्याच्या अधीन का होऊ नये' हे सांगितले.

'माणसाला क्रोध कधी येतो?' असे जर विचारले, तर त्याचे उत्तर म्हणजे- त्याच्या मनासारखे घडले नाही, त्याला हवे ते मिळाले नाही किंवा अपमानास्पद अनुभव आला तर क्रोध येतो. परंतु, क्रोध येण्याने शरीरविज्ञानाच्या दृष्टीनेही शरीरावर काहीसे विपरीत परिणाम होतात. जो सतत क्रोधित होतो, त्याच्यापासून सर्वसाधारण माणसे शक्यतो दूरच राहतात. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातही माणसाच्या अध:पतनाचा प्रवास रेखाटताना भगवान श्रीकृष्णाने क्रोधातून विवेकशून्यता आणि त्यातून पुढे बुद्धिनाश व बुद्धिनाशातून विनाश- ही साखळी मांडलेली आहे.

क्रोधाच्या वृत्तीने माणसे दुरावत असतील, तर ते केव्हाही चांगले नाही. प्रत्येक वेळी आपल्याला हवे ते मिळेलच, असे नाही. समाधानी वृत्तीच नसेल, तर हवी ती वस्तू मिळाल्यानंतरही अतृप्तीमुळे आपण असंतुष्टच राहतो. सर्वांशी आपलेपणाने संबंध निर्माण करावयाचे असतील, तर प्रसंगी स्व-भाव सर्वसमावेशक करीत राहण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. श्रीसमर्थ रामदासस्वामींनीही 'नको रे मना क्रोध हा खेदकारी' असे म्हटले आहे. तापट स्वभावाने आपल्याला त्रास होतो, इतरांनाही आपण नकोसे होतो. क्रोधात अविवेकी वर्तन घडत असते. यासाठी वडिलधारी मंडळीही नेहमी सांगतात की, 'राग आल्यावर एक-दोन असे दहापर्यंत आकडे मोजा.' या अंक मोजण्याने आपले लक्ष क्रोध निर्माण करणाऱ्या विचारांपासून परावृत्त होते आणि अविचार टळतो. आपण निर्भय होण्यासाठी तसेच इतरांनाही आपल्याविषयी निर्भय राहण्यासाठी विचारी मनुष्य क्रोधाचा स्वीकार करीत नाही.

**लक्ष्मीकांत जोशी, नाशिक**
मोबा. ९९७०९३०२७६

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
श्री. आनंद पराडकर - मो. ९३२६८२६८८४

# वेदाभ्यास. . .

**वेदाध्ययन किती कठीण आहे याची तथाकथित सुशिक्षित समाजाला पण फारशी कल्पना नसते. त्याची जराशी तोंड-ओळख करून देणारा हा लेख !**

संथा देणे म्हणजे, वेदपाठ शिकविणारे गुरुजी- समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना मंत्राचे छोटे तुकडे (चरण) पाडून, आपल्यामागे घोकायला/म्हणायला सांगतात. याला प्राथमिक अर्थाने संथा-देणे असे म्हटले जाते. यापुढे... (विद्यार्थ्यांनी) संपूर्ण पाठांतर करण्याच्या विशिष्ट पद्धतीला संथा घालणे अगर संथा म्हणणे... असे म्हटले जाते.

एखादा विषय/याज्ञिकातला प्रयोग/संहितेचा अध्याय (तोंड) पाठ करताना संथा म्हणण्याचे ४ टप्पे असतात.

१) चरणाची संथा

२) अर्धनीची संथा

३) ऋचेची संथा

४) गुंडिकेची संथा

१) चरणाच्या संथेत... गुरुजी प्रथम समोर बसलेल्या विद्यार्थ्यांना मंत्राचा एकेक चरण दोनदा सांगतात... मग विद्यार्थ्यांनी (पोथीत बघून) तो त्यांच्यामागून ७ वेळा घोकायचा. यात म्हणताना चूक झाली की, पुन्हा सुरुवात. यात...... शुद्ध अक्षर, जोडाक्षर, त्याचे गुरुत्व, अनुस्वारांचे उच्चार, स्वराघात, ऱ्हस्व आणि दीर्घ/प्रदीर्घ- असे विसर्ग (आणि त्यांचे तसेच उच्चार) हे शंभर टक्के शुद्ध होत आहेत की नाहीत, हे गुरुजी कसून तपासत असतात. (कारण एकदा अशुद्ध पाठ झालं की, ती (मेंदूत उमटलेली) प्रिंटआऊट पुसणं कर्मकठीण असतं.) .......तर हे स्तोत्रातले पाडलेले एकेक चरण ७ वेळा घोकत संपूर्ण अध्याय वा स्तोत्र पूर्ण केलं जातं... ही झाली चरणाची पहिली संथा.




अशा चार संथा झाल्या की, 'चरण' पूर्ण होतो. ही सगळी संथा गुरुजींसमक्ष होते.

(कारण तेच- मंत्रात अशुद्धी राहू नये.)

२) अर्धनीच्या संथेत, सामान्यतः मंत्राची अर्धी ओळ सात वेळा म्हटली जाते. आधी चरण डोक्यात बसलेला असतोच, त्यामुळे इथपासून गुरुजी समोर नसले तरी चालते. तर, ही... एकामागून एक ओळ पूर्ण सात वेळा घोकत... संपूर्ण अध्याय पूर्ण केला की, अर्धनीची १ संथा झाली... आता अशाच पुढे अजून ३ संथा म्हणायच्या, म्हणजे या अर्धनीच्या चार संथा होतात.

३) ऋचेच्या संथेत, मागील अर्ध्या ओळीच्या संथेचा पुढचा भाग सुरू होतो. म्हणजे आता २ ओळींची संपूर्ण ऋचा आणि पुढच्या ऋचेचा पहिला चरण (धरून), असे सात वेळा म्हणायचे. यातील पुढच्या ऋचेचा पहिला चरण घेण्याचे वैशिष्ट्य असे की, यामुळे संपूर्ण अध्यायातल्या प्रत्येक पहिल्या ऋचेची दुसऱ्या ऋचेशी गुंफण तयार होते. (कनेक्टिंग होते.) यातल्या या (पहिल्या) संथेवर, शिकविणाऱ्या गुरुजींचे बारीक लक्ष असते. (कारण तेच- अशुद्धी आली किंवा तयार झालेली आहे काय, हे पाहणे.) ह्या ऋचेच्या परत पुढे तीन संथा म्हणायच्या, म्हणजे या ऋचेच्याही एकंदर चार संथा पूर्ण होतात.

४) गुंडिकेची संथा.. हा शेवटचा परंतु अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. आता मागील ऋचेच्या संथेने हिचेच निम्मे काम केलेले असते. पण तरीही, आता कितीही पाठ येत असले तरी (यातल्या पहिल्या संथेला), पोथीत पाहूनच सदर पाठांतराच्या अध्यायाचा एकेक अनुवाक अथवा वर्ग (परिग्राफ) ७ वेळा म्हणायचा असतो आणि तो सगळा अध्याय पूर्ण करायचा असतो. ही झाली गुंडिकेची पहिली संथा..

अशा अजून तीन म्हणून ह्या गुंडिकेच्या चार संथा पूर्ण करायच्या. या गुंडिकेच्या संथेमध्ये, साधारणपणे दुसऱ्या किंवा तिसऱ्या संथेपासून (आता) विद्यार्थ्याची इच्छा अगर तयारी नसली, तरी विद्यार्थ्यांनी पोथीत न पाहताच, मान वर करून संथा म्हणायची असते. कारण त्याशिवाय पाठ म्हणता येणे, ही क्रियाच आकाराला येऊ शकत नाही. अर्थात कोणत्याही सर्वसामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्याला यातल्या शेवटच्या २ संथांमध्ये सर्व काही बिनचूक तोंडपाठ येतेच. पण त्याहून (बुद्धीने) आगे/ मागे जे असतील त्यांना कमी अगर जास्त कष्ट घ्यावे लागतात. तर, अशा ह्या एकंदर १६ संथा घातल्या की, आपल्याला अपेक्षित असलेला पाठांतराचा विषय तयार होतो.

**आवृत्ती :**

हा वेदाध्ययनातला अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एकदा पाठ झालेला विषय/अध्याय किमान २ वर्षे तरी दररोज १ आवृत्ती म्हणून जिवंत ठेवावा लागतो. नाही तर आमच्याकडल्या प्रसिद्ध म्हणीप्रमाणे.. तो नवव्या दिवशी नवा होतो. आणि तसंही हे सोपं काम नसतंच. नुसती ऋग्वेदाची संहिता घेतली... तरी त्यात आठ अष्टके म्हणजे ६४ अध्याय आहेत. अध्ययन सुरू झाल्यापासून जसजसे पाठांतर वाढत जाईल तसतसा हा आवृत्तीचा काळ वाढत जातो आणि दर दोन वर्षांनी बॅलन्स होत राहतो. मग पुढे ब्राह्मण/आरण्यक/उपनिषदे/शिक्षा चतुष्ट्य/ज्योतिष (फलज्योतिषवालं नव्हे!)/शास्त्र/ निरुक्त असे अनेक ग्रंथोपग्रंथ पचवत, जिवंत ठेवत अध्ययन करावे लागते. एका वेदाच्या अध्ययनाला पहिल्या वर्षाला ६ तास इथपासून सुरुवात होऊन. शेवटच्या वर्षाला हा कालावधी १६ ते १८ तासांपर्यंत जाऊन बसतो. म्हणूनच ऋग्वेदाचे दशग्रंथ पूर्ण कंठस्थ (पाठ) होण्याचा कालावधी १२ वर्षे आहे. पाठांतरातील अग्निदिव्य – संचार जाणे. संचार हा पाठांतराच्या वाटेतला अटळ सहप्रवासी आहे.

**आता संचार म्हणजे काय ?**

तर, एकसमान किंवा तोच तोच शब्द वा मंत्र संपूर्ण अध्ययनाच्या विषयांमध्ये कुठेही वारंवार येणे. यामुळे काय होते? तर... एका महारस्त्यावर जवळजवळ समान नावं असलेले दोन फाटे असतील... तर नामसाधर्म्याच्या गोंधळामुळे माणूस जसा याऐवजी त्या गावात पोहोचावा, तसे काहीसे हे समान मंत्र अथवा शब्द करीत असतात. ऋग्वेदाच्या नुसत्या संहितेमध्ये असे हजारो संचार आहेत. नुसतं त्याच संहितेमधून वेगवेगळे पाच अध्याय व दोन सूक्ते एकत्र करून निर्मिलेलं जे पंचसूक्त पवमान आहे, त्यात सुमारे अडीचशे संचार आहेत. बरं, हे संचार म्हणजे फक्त (समान) शब्द आणि संपूर्ण अथवा अर्ध्या (समान) मंत्राचेच आहेत काय? आणि नुसते तेवढेच आहेत काय? तर, तसे नाही. काही ठिकाणी तर फक्त या अध्यायात या ओळीत (विशिष्ट शब्दावर) मात्रा आहे.. आणि एकदम पुढच्या कुठल्या तरी अध्यायात तोच मंत्र पण त्यात (विशिष्ट शब्दावर) (आता) मात्रा नाही, एवढाच फरक आहे. म्हणजे ही पवमानातली गंमत बघा– एके ठिकाणी 'शुंभमान ऋतायुभिः' असे आहे, तर दुसरीकडे, 'शुंभमानो ऋतायुभिः'– असे आहे. परत दोन्हीकडच्या पुढच्या ओळी निःसंशय वेगळ्याच असतात. आणि मग जर का हे लक्षात राहिले नाही, तर या अध्यायातून त्या अध्यायात उडी पडते. याच घडणाऱ्या प्रकाराला म्हणतात : संचार जाणे! उदाहरणादाखल आपण आणखी एक–दोन संचार पाहू........

**सुदुघाहि–पयस्वतीः** आणि **सुदुघाहि–घृतःश्रुतः** हा शब्दांचा संचार झाला... हाही सहज लक्षात राहतो. पण अनुस्वारांचे संचार म्हणजे मेंदूची शस्त्रक्रिया करताना जितकं बारीक आणि नजर न हलता लक्ष ठेवावं लागेल, तसला भयंकर प्रकार. तो असा –

**पवतामांतरिक्षा आणि पवंतामांतरिक्षा**

– या शब्दातल्या दुसऱ्या अक्षरावर, म्हणजे व– वर प्रथम अनुस्वार नाही आणि नंतर पुढे, तोच अनु–स्वार– झालेला आहे!!! इतका सूक्ष्म फरक लक्षात राहणे मुश्कील.. आणि मग इकडून तिकडच्या अध्यायात उडी पडणे निश्चित! यातलं पंचसूक्त पवमान हे पाठ ठेवायला अत्यंत कर्मकठीण आहे.

हे पाठ झाल्यापासून सलग तीन महिने याची आवृत्ती ठेवल्यानंतरही.. पुढे पुन्हा सलग २ महिने पाठ म्हणताना... रोज २ अथवा ३ संचार जायचेच! आणि तेही रोज वेगवेगळे! आज ह्या गल्लीत चुकलो की, उद्या त्या गल्लीत! रामा... शिवा... आणि गोविंदा.... बाकी काही नाही, असा अनुभव येतो.

आता आपल्या सुप्रसिद्ध रुद्रातला हा शब्दसंचार.. प्रत्यक्षच कसा जातो, ते पाहा...!

नमकाच्या पहिल्या अनुवाकातल्या तिसऱ्या ऋचेतली पहिली ओळ :–

**यातेरुद्र शिवातनु रघोरा पापकाशिनी।**

आणि पुढची (वेगळी) ओळ :–

**तयानस्तनुवा शंतमया गिरिशंता भिचाकशीहि।।**

आता इथून सरळ नमकाच्या दहाव्या अनुवाकातली दुसऱ्या ऋचेतली पहिली ओळ :–

**यातेरुद्र शिवातनुः शिवाविश्वा हभेषजी।**

आणि पुढची (वेगळी) ओळ :–

**शिवारुद्रस्य भेषजी तयानोमृड जीवसे।।**

आता यात जर का रुद्र म्हणणारा माणूस पहिल्या अनुवाकात, 'यातेरुद्र

शिवातनु:'च्या पुढे 'शिवाविश्वा हभेषजी' असे चुकून म्हणून गेला, तर त्याची पाठांतरपद्धतीमुळे मेंदूत कोरली गेलेली पुढची ओळ ही दहाव्या अनुवाकातली, म्हणजे 'शिवारुद्रस्य भेषजी तयानोमृड जीवसे।।' हीच तोंडातून उमटणार. हा गेला संचार!

आणि याच्याही अगदी उलट घडून दहाव्या अनुवाकातून पहिल्या अनुवाकात असा उलटाही संचार जाणार! आणि कितीही कुशाग्र बुद्धिमत्तेचा माणूस असला, तरी संपूर्ण एका वेदातले हजारो संचार लक्षात ठेवणं, हे सामान्य बुद्धिमत्तेच्या बाहेरचंच काम.. मग हे काम सोप्पं व्हावं म्हणून पुढे.. वेदांमधे पद/क्रम/जटा/माला/घन अशी सोय निर्माण करण्यात आली. याचा उचित वापर केला की... हे संचारचं गाडं आडवं आलं तरी त्याला नीट उभं करता येतं.

अर्थात, ज्या अध्ययनाचा आधार फक्त आणि फक्त पाठांतर हाच (राहिला) होता, त्या अतिप्राचीन (लेखनकलेची सुरुवातही न झालेल्या) कालखंडात अशा तऱ्हेच्या युक्त्या अथवा सोई सुचणं, हेही त्याच मानवी बुद्धीशी सुसंगत म्हटलं पाहिजे. मग त्याचं समर्थन आजच्या आणि (या) पुढच्या काळात कोणत्याही पद्धतीने अगर हेतूने होवो. आज या निमित्ताने हा (पाठांतराचा) छोटासा आढावा घेणारा लेख लिहून झाला, याचं समाधान दोन कारणांनी आहे.

वेदज्ञान.. हे त्या किंवा आजच्या अथवा पुढच्या काळात उपयोगी/निरुपयोगी... उपकारक/ अनुपकारक असं कसंही असलं, तरी हे ज्ञान पूर्वी आणि आजही पाठ ठेवणारे जे वेदाध्यायी आहेत, त्यांच्या बुद्धिमत्तेची जाणीव या लेखनामुळे करवून देता आली. (एरवी हे नुसतं सांगून शक्य नाही आणि नसलंही पाहिजे. Smile Emotion) याशिवाय, जे लोक 'हॅ:ऽऽ... हे शिकायला काय अक्कल अथवा बुद्धी लागते?' असे (कोणत्याही हेतूने) म्हणतात; त्यांना किमान हा लेख वाचल्यानंतर पुन्हा असं म्हणताना काही क्षण थांबून नक्कीच विचार करावा लागेल.

**संकलन: श्री. श्रीगजानन गुर्जर**

---

# दान



दि. २६ डिसेंबर २०१५ चा दिवस. मी सकाळची सर्व कामे आटपून पेपर वाचत होते, तोच मामेभावाचा फोन आला आणि त्याने ११.०० वाजता ती. मामीला देवाज्ञा झाल्याचे सांगून व आम्हाला दोघांना येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही दोघे जण त्यांच्याकडे रवाना झालो.

मामीचे वय ८२ होते. मामेभावाने आईची नेत्रदानाची इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे भांडुप येथील नेत्रपेढीला फोन केला आणि त्यांच्या सूचनेप्रमाणे मामीच्या डोक्याखालची उशी काढली व पंखा बंद ठेवला. नंतर नेत्रपेढीच्या डॉक्टरांची वाट बघत थांबलो.

कळवल्यापासून अर्ध्या तासात नेत्रपेढीचे डॉक्टर आले. त्यांनी मृत्यू दाखला बघितला व डोळे काढण्याच्या ऑपरेशनचे सर्व निर्जंतुक केलेले सामान काढले. कोणाला समोर बघायला भीती वाटणार नाही ना, हे विचारून कामाला सुरुवात केली. प्रथम मृत शरीरातून–छातीतून नमुन्यासाठी रक्त घेतले आणि पंधरा मिनिटांत दोन्ही डोळे व्यवस्थित काढून बर्फाच्या डब्यांत (निर्जंतुक डब्यांत) ते ठेवले. डोळ्यांच्या खाचा कापूस टाकून बंद केल्या. कोठेही रक्त आले नाही, चेहरासुद्धा जसाच्या तसा होता.

दोन नेत्रहीनांना उपयोग झाल्याचा दोनच दिवसांनी नेत्रपेढीतून त्यांचा फोन आला.

पुढे आठवड्यानंतर त्यांच्याकडूनच मामीच्या नावे मरणोत्तर नेत्रदानाचा दाखला (सर्टिफिकेट) आले. असे आमच्या मामीचे मृत्यूनंतरचे नेत्रदान पार पडले.

नेत्रदान, देहदान हेच महत्त्वाचे दान आहे.

**सौ. वैशाली हर्डीकर**

मो. : ८६८९९३३३२८

## चविष्ट चारोळ्या



**मिरची जितकी बारीक**
**तितकी तिखट खूप,**
**म्हणून लग्न करते वेळी**
**पत्नीचं असावं जाड रूप!**

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. हेमंत किर्लोस्कर – मो. ९८२०१६४५७७**

# पौष महिना शुभ की अशुभ?

वर्षातील बारा महिन्यांपैकी एक असलेला पौष महिना. पण त्याविषयी अनेक समज आहेत. इतके की, पौष सुरू झाला म्हणून अनेक शुभ कार्ये पुढे ढकलली जातात. तर महत्त्वाची बोलणी टाळली जातात, नवे व्यवहार होत नाहीत– इतका महिना वाईट असल्याची समजूत असल्याने याची भयंकर भीती जनसामान्यांमध्ये आहे. तर, धर्मशास्त्रानुसार हा महिना खरंच इतका वाईट आहे का, याचा घेतलेला हा धांडोळा.......

चैत्र मास वर्षारंभातील दहावा महिना, तर हेमंत ऋतूतील दुसरा मास म्हणजे पौष महिना. त्याला तैष आणि सहस्य अशी अन्य दोन नावंही आहेत. अधिक मासाला जसं मलमास किंवा धोंडामास म्हणतात, तसं याला भाकडमास म्हटलं जाऊ लागलं. कारण मकर संक्रांतीशिवाय या महिन्यात अन्य सण नाहीत, असा सार्वत्रिक समज. मात्र निर्णयसिंधु, धर्मसिंधु या ग्रंथांत या महिन्यात करण्याची काही कृत्यं सांगितली आहेत, ती अशी –

१) पौष पौर्णिमेपासून पौर्णिमांत माघ सुरू होतो, म्हणून या दिवसापासून माघस्नानाला प्रारंभ करावा.

२) पौष शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा हा शाकंभरी देवीचा महोत्सव (नवरात्र) शारदीय नवरात्रोत्सवासारखा असतो.

३) पौष शुद्ध अष्टमीला जर बुधवार असेल तर शिवप्रीत्यर्थ स्नान, जप, होम, तर्पण व ब्राह्मणभोजन करावं.

४) पौष अमावास्येला अर्धोदय पर्व आलं असता स्नानदानादी धर्मकृत्यं करावीत.

५) शिवलिंगावर तुपाचा अभिषेक महिनाभर करावा. या शिवापुढे दीपाराधना करावी.

६) पौषाच्या दोन्ही पक्षांतील नवमीला उपवास करून दुर्गेची त्रिकाळ पूजा करावी. दुर्गेची मूर्ती पिठाची करावी. व्रतानिमित्त आठ कुमारिकांना भोजन घालावं.

७) महिनाभर एक वेळ उपवास करून जे शक्य असेल, ते दान करावं.

८) रवि धनु राशीत प्रवास करून मकर राशीपर्यंत प्रवेश करेपर्यंतच्या कालखंडाला धनुर्मास म्हणतात. धनुर्मास श्रावणासारखाच पवित्र मानला जातो. या धनुर्मासाचे काही दिवस पौषात येतात. संपूर्ण धनुर्मासात सूर्योदयापूर्वी देवपूजा व आन्हिक उरकून देवास महानैवेद्य दाखवण्याची पद्धत आहे. महानैवेद्यास मुगाच्या डाळीची खिचडी, गुळाची पोळी, बाजरीची भाकरी, वांग्याचे व तिळाचे पदार्थ केले जातात.

वरील विवेचनावरून धार्मिक कार्यासाठी हा महिना निषिद्ध नाही, हे स्पष्ट होतं. आता राहिला प्रश्न विवाह आणि वास्तुविषयक कार्याचा. पौष महिन्यात रवि धनूत असताना विवाहाचे मुहूर्त घेऊ नयेत, असे शास्त्र सांगते. मात्र उर्वरित महिना विवाहासाठी वर्ज्य नाही. हा महिना शुभ कार्यासाठी वर्ज्य आहे, ही निव्वळ खुळचट कल्पना असून तिला कसलाही शास्त्राधार नाही. धर्मशास्त्र अभ्यासकांच्या मते, पितृपंधरवडाही सर्वच शुभ कार्यासाठी वर्ज्य नसतो. महिन्याचा बागुलबुवा करू नये.

सोप्या आणि सहज भाषेत सांगायचे तर– श्री खंडोबा आणि श्री म्हाळसादेवी यांचा विवाह पौष महिन्यामध्ये शुक्ल त्रयोदशीला मृग नक्षत्र असताना गोरज मुहूर्तावर पाली येथे होत असतो. त्यामुळे जनसामान्यांना या महिन्यामध्ये विवाह करण्यास हरकत नसावी. गृहप्रवेश आणि वास्तुशांतीसाठी हा महिना अजिबात वर्ज्य नाही. मुख्य घराचं बांधकाम या महिन्यात सुरू करू नये, पण अगोदर सुरू असलेलं बांधकाम थांबवू नये. घराऐवजी कुंपण किंवा अन्य कामे करायला हरकत नाही. घराची दुरुस्ती, रंगरंगोटी, फर्निचर वगैरे करायला हरकत नाही. संपूर्ण महिनाभर घरखरेदी, दागिने खरेदी, प्रवास वा अन्य नैमित्तिक कामं निर्धास्तपणे करावीत.

काहींच्या मते पौष हे नाव पुष्य नक्षत्रावरून मिळाले असल्याने नक्षत्र स्वामी शनीचा प्रभाव या महिन्यावर असतो आणि शनिग्रह वैवाहिक सौख्यासाठी मारक असल्याने या महिन्यामध्ये विवाह करू नयेत. परंतु, प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला जे चंद्र नक्षत्र असते, त्यावरून त्या महिन्याला नाव मिळाले आहे. जसे– चित्रा– वरून चैत्र, विशाखावरून वैशाख इत्यादी. आणि पौर्णिमेच्या त्या चंद्र नक्षत्राचा त्या महिन्यावर प्रभाव असतो, असे ज्योतिषशास्त्राच्या आधारावर सांगतात. त्यापैकी पौष पौर्णिमेला पुनर्वसू नक्षत्र असते, त्यामुळे हा युक्तिवाद तकलादू आणि न पटण्याजोगा वाटतो.

पौष महिन्यात शुभ कार्य करत नाहीत, ही रूढी बनली आहे म्हणून ती पाळावी. कारण शास्त्रात 'रूढी बलियेसी', असं वचन आहे, असा युक्तिवाद काही जण करतात. मात्र वरील वचनात हा पंचमी विभक्तीचा प्रत्यय असून पेक्षा आणि पासून अशा दोन्ही अर्थानं तो वापरला जातो. म्हणून वरील वचनाचा अर्थ शास्त्रापेक्षा रूढी बलवान असा नसून, शास्त्रापासून उत्पन्नच झालेली रूढी बलवान असा काढता येईल. अर्थात, जी रूढी शास्त्रापासून उत्पन्नच झाली नाही, ती न पाळणंच योग्य. दुसरा वेड्यांच्या बाजाराला चाललाय म्हणून आपणही निघावं, हे काही खरं नाही.

आयुष्य मुळात छोटं आहे. खुळचट कल्पनांच्या नादी लागून एक महिना वाया कशाला घालवायचा?

**संकलन: श्रीगजानन गुर्जर**
ज्योतिष विशारद

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. श्रीराम देव – मो. ९८६९५६७८५०**


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12%
of facebook posts are read
29%
of tweets are read
31%
of emails are opened
98%
of text messages are read
CHECKED
150
TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75%
of people prefer receiving marketing messages via SMS
15%
prefer receiving email ads
10%
prefer in-app or push ads
Solv Technologies
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
www.2Factor.in
95-5459-5459

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - +91251 2482106, +91251 2483476.
•SHOP NO.1: Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - 97026 55000.
•SHOP NO.2: Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - +91251 2433193. Mo. - 9702811122.

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) 0251 - 2860720, 9702666000, Fax: 2483351.
Email: ynakhye@gmail.com
Website: www.shubhamangalhall.com

EVEREST
HALL

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: 9702622000, 9702011131

EVEREST
DISTRIBUTORS

DISTRIBUTORS FOR
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico), Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India
Tel: +91 251- 2483476, 2482106.
Fax: +91 251- 2483351. Email: anakhye@gmail.com


finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: 91251 2480305

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा
श्रीमती सरोजिनी कऱ्हाडे - मो. ९८२०१६४५७७

# गुरुमाहात्म्य



एकदा गुरू आणि देव असे दोघे एका शिष्याच्या घरी येतात. तेव्हा शिष्य पहिल्यांदा देवांच्या पायाजवळ नमस्कार करायला जातो. देव त्याला म्हणतात, ''तू पहिल्यांदा गुरूंना नमस्कार केला पाहिजेस.

जेव्हा शिष्य हा गुरूंच्या पायापाशी जातो, तेव्हा गुरू म्हणतात, ''मी देवाला तुझ्या घरी आणले आहे, त्यामुळे पहिला नमस्कार देवाला कर.''

शिष्य परत देवाच्या चरणाजवळ येतो, तेव्हा देव म्हणतो, ''तुझ्या गुरूंनी देवाला तुझ्या आयुष्यात आणले आहे, त्यांनी माझा लाडका भक्त होण्याचा मार्ग तुला सांगितला. त्यामुळं गुरूंच्या चरणांपाशी प्रथम जा.''

जेव्हा गुरूंच्या चरणांजवळ भक्त जातो तेव्हा गुरू म्हणतात, ''मी तुला फक्त भक्तीचा मार्ग सांगितला, पण देवाने तुला निर्माण केलंय; नाही कां ?'' त्यामुळे जा आणि देवाच्या चरणांशी आधी नतमस्तक हो.'' त्यानंतर तो भक्त देवाच्या चरणांजवळ गेला, तेव्हा देव म्हणाले, ''थांब, हे सगळं बरोबर आहे. पण आता मी तुला देवाची आणि गुरूंची प्रमुख तत्त्वं सांगणार आहे...

**''देवाच्या तत्त्वात -**

माझ्याकडे न्यायव्यवस्था आहे. जर का तू चांगलं कार्य केलंस; तर तुला त्याचं चांगलंच फळ मिळेल, चांगलं आयुष्य मिळेल आणि मुक्ती मिळेल. पण जर का तू वाईट कर्मं केलीस, तर तुला तर त्याचे वाईटच फळ मिळेल. तुला शिक्षा होईल, तू या मायाजालात अडकशील आणि त्यात बुडून जाशील. तुझा आत्मा संघर्ष करीत राहील.

**''आता तुला गुरूंची तत्त्वे सांगतो.**

जेव्हा तुम्ही गुरूकडे जाता, तेव्हा ती प्रेमळ-शांत मूर्ती असते. तुम्ही कसेही असाल, कसेही वागत असाल, तुमची कर्मे कशीही असली; तरीही ते आपल्या शिष्याला प्रेमाने आपल्या कुशीत घेतात. ते आपल्या शिष्याला शुद्ध करतात आणि मग माझ्या चरणांशी आणतात.

''त्यामुळे गुरु कधीही, कोणालाही स्वतःहून आपल्यापासून दूर लोटत नाहीत; तर उलट ते आपल्या शिष्याला हिऱ्याप्रमाणे पैलू पाडतात. त्याला शुद्ध करून मग माझ्या चरणांशी आणतात.

''त्यामुळे मी नेहमी पृथ्वीवर गुरूच्या रूपातच येतो.''


श्री गुरुदेव दत्त ।।




कै. दि.वा.
१८८५-१९६६



कै. भा. दि.
१९१३-१९६८



कै. अ. भा.
१९४४-२०१५

**३ पिढ्यांच्या अथक परिश्रमानंतर**
**१०० व्या वर्षात पदार्पण**

**मे. डी. व्ही. भाटवडेकर**

**क्लॉथ मर्चंट्स**

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता, नू.म.वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११०३०.
email : dwb10051917@gmail.com, फोन नं. : २४४५६०४७, मोबा. : ९८५०९७९७०६

सकाळी १० ते १ दुपारी ४.३० ते ८.३०. सोमवार बंद

# गर्वहरण



कालिदासांना ही प्रौढी उत्पन्न झाली होती की, ते खूप मोठे ज्ञानी झालेत. एकदा प्रवासात त्यांना तहान लागली. त्यांनी पाहिलं की, जवळच एक वृद्ध स्त्री विहिरीवरच पाणी भरत आहे. कालिदास म्हणाले, ''माते, मला पाणी देशील तर तुला खूप पुण्य मिळेल.'' वृद्ध स्त्री म्हणाली, ''बाळा, मी तुला ओळखलं नाही. कृपया तू तुझा परिचय दे, मग मी तुला पाणी देते.'' मग कालिदासाने परिचय देण्यास सुरुवात केली.

कालिदास म्हणाले, ''मी प्रवासी आहे.''

वृद्ध स्त्री म्हणाली, ''प्रवासी तर फक्त दोनच आहेत- एक चंद्र आणि दुसरा सूर्य, जे दिवसरात्र चालतच असतात.''

कालिदास म्हणाले, ''मी अतिथी आहे. पाणी मिळेल?''

वृद्ध स्त्री म्हणाली, ''अरे, अतिथी तर फक्त दोनच आहेत. एक- धन आणि दुसरं- तारुण्य. ते निघून जातात. खरं सांग, तू कोण आहेस ?''

कालिदास म्हणाले, ''मी सहनशील आहे. आता तरी पाणी मिळेल?''

वृद्ध स्त्री म्हणाली, ''अरे, सहनशील तर फक्त दोनच आहेत, एक धरती आणि दुसरं झाडं. धरती- जी पुण्यवान लोकांबरोबर पापी लोकांचंदेखील ओझं घेऊन आहे. आणि झाडं – ज्यांना दगड मारला तरी ती मधुर फळंच देतात.''

कालिदास आता हतबल झाले. कालिदास म्हणाले, ''मी हट्टी आहे.''

वृद्ध स्त्री म्हणाली, ''नाही, तू हट्टी कसा असशील? हट्टी तर फक्त दोनच आहेत- एक- नख आणि दुसरे- केस. कितीही कापले तरी परत वाढतातच.''

कालिदास आता कंटाळले आणि म्हणाले, ''मी मूर्ख आहे.''

वृद्ध स्त्री म्हणाली, ''मूर्ख तर फक्त दोनच आहेत. एक- राजा, ज्याची योग्यता नसताना तो सर्वांच्यावर राज्य करतो. आणि दुसरा, दरबारातील पंडित, जो त्या राजाला रिझवण्यासाठी चुकीच्या गोष्टी खरं सिद्ध करण्याची चेष्टा करतो.''

कालिदास आता काहीही बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हते, ते त्या स्त्रीच्या पायावर डोकं ठेवून पाण्यासाठी विनवणी करू लागले.

वृद्ध स्त्री म्हणाली, ''उठ बाळा...'' आवाज ऐकून कालिदासांनी वर पाहिलं, तर त्या स्त्रीच्या जागी साक्षात सरस्वतीदेवी उभी होती! कालिदास आता नतमस्तक झाले.

सरस्वतीदेवी कालिदासांना म्हणाली, ''शिक्षणाने ज्ञान येते, अहंकार नाही. शिक्षणाच्या बळावर मिळालेला मान, प्रतिष्ठा यालाच तू सर्वस्व समजलास आणि त्याचा तुला अहंकार आला. तुझे डोळे उघडणे आवश्यक होते.'' कालिदासांना त्यांची चूक उमगली, ते भरपूर पाणी पिऊन पुढील प्रवासाला निघाले.

तात्पर्य : विद्वत्तेवर कधीच गर्व करू नका.

संकलन
**सुहास खानवलकर, पुणे**
९४०३९२८५२०

## सुभाषित



**पिकस्तावत्कृष्णः परमरुणया**
**पश्यति दृशा परापत्यद्वेषी**
**स्वसुतमपि नो पालयति यः।**
**तथाप्येषोऽमीषां सकलजगतां**
**वल्लभतमो न दोषा गण्यन्ते खलु**
**मधुरवाचां क्वचिदपि ॥**

खरोखर कोकिळ हा अन्तर्बाह्य काळाकुट्ट आहे. तो तांबड्या-लाल डोळ्यांनी रागानेच बघतो. दुसऱ्यांच्या पिल्लांचा द्वेष तर करतोच, पण स्वतःच्या पिलांचादेखील सांभाळ करीत नाही. तरीसुद्धा तो सर्व जगाचा अत्यंत आवडता असतो.

मधाळ बोलणाऱ्यांच्या दोषांचा कधीही विचार केला जात नाही. साखरपेऱ्या भाषेमुळे लोक फसतात.

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. आनंद खंडकर – मो. ९८५००८८८७४**

# ज्ञानेश्वरीचि वैज्ञानिकता

विज्ञानयुगाचा अभिमान धरणाऱ्या मंडळींना ज्ञानेश्वरीने विज्ञानावर कशी मात केली आहे, हे त्यातील काही ओव्यांवरून लक्षात येईल.

अलीकडच्या काही शतकांमध्ये जे क्रांतिकारक शोध लागले आहेत, त्यांचे मूळ ज्ञानेश्वरीत सापडते.

सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरते, हा शोध कोपर्निकसने लावला. त्याचा हा सिद्धांत बायबलविरोधी असल्याने धर्ममार्तंडांनी त्याचा छळ केला. कारण बायबलमध्ये 'पृथ्वी स्थिर असून सूर्य फिरतो,' असा उल्लेख आहे (आणि यांना आपण विज्ञाननिष्ठ समजतो). ज्ञानेश्वरीने ७२५ वर्षांपूर्वीच सूर्याचे भ्रमण हा भास आहे, हे वैज्ञानिक सत्य मांडले होते.

**उदय-अस्ताचे प्रमाणे,**<br>
**जैसे न चालता सूर्याचे चालणे,**<br>
**तैसे नैष्कर्म्यत्व जाणे,**<br>
**कर्मीचि असता ।।**

सूर्य चालत नसून चालल्यासारखा दिसतो. सूर्याचे न चालता चालणे हा ज्ञानेश्वरीतील क्रांतिकारक शोध ठरत नाही काय?

मानवी जन्माची प्रक्रिया कसल्याही उपकरणाची मदत न घेता ज्ञानेश्वरमहाराज जेव्हा सांगतात, तेव्हा नामांकित डॉक्टरांनाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. माऊली लिहितात,

**'शुक्र-शोणिताचा सांधा,**<br>
**मिळता पाचांचा बांधा,**<br>
**वायुतत्त्व दशधा, एकचि झाले।।'**

पुरुषाच्या वीर्यमध्ये शुक्रजंतू असतात व शोणित पेशी स्त्रियांच्या



बीजांडकोशात असतात. या शोणित पेशी अतिसूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय दिसत नाहीत. सूक्ष्मदर्शक यंत्राचा शोध चारशे वर्षांतील आहे. परंतु माऊलींनी कसल्याही सूक्ष्मदर्शकाच्या मदतीशिवाय शोणित पेशींचा उल्लेख केला आहे.

माऊली कुठल्या मेडिकल कॉलेजात गेले होते? इथे त्यांच्यातील सर्वज्ञता दिसते.

'पृथ्वी सपाट आहे की गोल?' या प्रश्नावर शास्त्रज्ञांत बराच काळ वाद चालला होता. पृथ्वी गोल आहे, हा सिद्धांत आता जगन्मान्य झाला आहे.

ज्ञानेश्वरीने ७२५ वर्षांपूर्वीच पृथ्वी गोल असल्याचे सांगितले.

**'पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा,**<br>
**तरी हा भूगोलचि काखे सुवावा,**<br>
**तैसा विस्तारू माझा पाहावा,**<br>
**तरी जाणावे माते।।'**

भूगोल हा शब्दच ज्ञानेश्वरीने मराठीला दिला आहे आणि पृथ्वी गोल असल्याचे निःसंदिग्ध सांगताना परमाणूचाही (Micro-Electron) स्पष्ट उल्लेख केलाय.

पाण्याच्या घर्षणातून जलविद्युत निर्माण होते, हा विजेचा शोधही शे-दिडशे वर्षांपूर्वीचा आहे; परंतु माऊली ७२५ वर्षांपूर्वीच सांगतात की, पाण्याचे जोरात घर्षण झाले की वीज तयार होते.

**'तया उदकाचेनि आवेशे,**<br>
**प्रगटले तेज लखलखीत दिसे,**<br>
**मग तया विजेमाजी असे,**<br>
**सलील कायी।।'**

सागराच्या पाण्याची वाफ होते, त्याचे ढग बनतात व त्याला थंड हवा लागली की पाऊस पडतो. ही पाऊस पडण्याची प्रक्रिया विज्ञानाने अलीकडे शोधून काढली आहे. परंतु ज्ञानेश्वरीत माऊली लिहितात की, सूर्याच्या प्रखर उष्णतेने मी परमात्माच पाणी शोषून घेतो आणि त्या वाफेचे ढगात रूपांतर करतो व इंद्रदेवतेच्या रूपाने पाऊस पाडतो.

पावसाचे शास्त्रशुद्ध तंत्र सांगणारी ती ओवी अशी :

**'मी सूर्याचेनि वेषे,**<br>
**तपे तै हे शोषे,**<br>
**पाठी इंद्र होवोनि वर्षे,**<br>
**मग पुढती भरे।।'**

विज्ञानाला सूर्यमालेतील ग्रहांचा शोध लागला आहे.

या विश्वाच्या पोकळीतील फक्त एकच सूर्यमाला मानवी बुद्धीला सापडली. अशा अनेक सूर्यमाला या पोकळीत अस्तित्वात आहेत. विश्वाला अनंत हे विशेषण लावले जाते. या विश्वात अनंत ब्रह्मांडे आहेत, म्हणून भगवान अनंतकोटी ब्रह्मांडनायक ठरतात. परंतु माऊलींनी ७२५ वर्षांपूर्वीच सूर्यमालेतील मंगळ या ग्रहाबद्दल लिहिले आहे. विज्ञानाने शोध

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री. वासुदेव रायकर - मो. ७७३८४५५५८८

लावण्यापूर्वीच माऊली मंगळाचे अस्तित्व सांगतात :

**'ना तरी भौमा नाम मंगळ,**
**रोहिणीते म्हणती जळ,**
**तैसा सुखप्रवाद बरळ,**
**विषयांचा।।'**

किंवा

**'जिये मंगळाचिये अंकुरी,**
**सवेचि अमंगळाची पडे पारी।'**

किंवा

**'ग्रहांमध्ये इंगळ, तयाते म्हणति मंगळ।'**

इतकेच नव्हे, तर नक्षत्रांचेही उल्लेख आहेत. रोहिणीचा वरच्या ओवीत आलाय, तसेच मूळ नक्षत्र :

**'परी जळो ते मूळ-नक्षत्री जैसे'**

किंवा स्वाती नक्षत्र :

**'स्वातीचेनि पाणिये,**
**होती जरी मोतिये,**
**तरी अंगी सुंदराचिये,**
**का शोभति तिये।।'**

कॅमेरा आणि पडद्यावर दिसणारा चित्रपट यांचे मूळही ज्ञानेश्वरीत सापडते :

**'जेथ हे संसारचित्र उमटे,**
**तो मनरूप पटु फाटे,**
**जैसे सरोवर आटे,**
**मग प्रतिमा नाही।।'**

अर्थात संकल्प-विकल्पांमुळे मनाचे चित्र उमटवणारा पडदा फाटून जातो. चित्रपटासाठी पडदा आवश्यक आहेच किंवा सरोवरात पाणी असेल, तरच आपली प्रतिमा त्यामध्ये उमटते. ते आटून गेले, तर उमटत नाही.

या सर्व ओव्यांचा आशय लक्षात घेतला,तर ज्ञानेश्वरीची वैज्ञानिकता ध्यानात येईल.

विज्ञानयुगात दिशाभूल झालेल्या युवक-युवतींनी ज्ञानेश्वरीची ही शास्त्रीयता लक्षात घेऊन मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याऱ्या संतवाङ्‌मयाच्या सहवासात यावे.

ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामगाथा व दासबोधाचा मनःपूर्वक ध्यास घ्यावा, म्हणजे प्रत्येकाला जीवनाचे अनंतरूप समजेल.

**बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठल**
**श्री ज्ञानदेव तुकाराम ऽऽ ।।**

# टाचणी

मी आहे इवलीशी टाचणी
किती उपयुक्त माझी टोचणी ।।धृ।।

कागदपत्र एकत्र करते
फाटक्या पिशव्यांना जोडते
थर्माकोलात रुतून बसते
पिनरूपाने पदर बांधते

मी आहे इवलीशी टाचणी
मदतीला धावते असोत कुणी ।।१।।

पायातला काटा काढते
कानातला मळ काढते
दोन्ही बाजूने मी उपयोगी
म्हणून लोक ठेवी जवळी

मी आहे इवलीशी टाचणी
साधी सरळ माझी राहणी ।।२।।

टोकाला माझ्या भलतीच धार
म्हणूनच माझा वापर फार
चेक स्लीपला घट्ट जोडते
विजेची बिले गोळा करते

मी आहे इवलीशी टाचणी
जाणते फक्त मी जोडणी ।।३।।

पायाला चुकून बोचले
बोटाला कुणाच्या टोचले
न वापरल्यामुळे गंजले
टाळतात ते मला सगळे

मी आहे इवलीशी टाचणी
समजून घ्या ना मला कुणी ।।४।।

जोडण्यात सारे आयुष्य गेले
ऐकण्यासाठी झटत राहिले
कसे हो हे जग असले
काम होताच मला फेकले

मी आहे इवलीशी टाचणी
खोक्यात राहू दे ना साऱ्याजणी ।।५।।

प्रदीप पु. सातवळेकर
भ्र. ९८६९६८३३३५

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री. विजय आंबर्डेकर - मो. ९८१९८८५६६५

# पुणे मनपाचे 'घन-कचरा व्यवस्थापन प्रकल्प' पारितोषिक सौ. अनिता तांबे यांना प्रदान



पुणे महानगरपालिकेतर्फे घन-कचरा व्यवस्थापनासाठी विविध प्रकल्प यशस्वीपणे राबवून म.न.पा.ला सहकार्य करणाऱ्या व्यक्तिगत, कुटुंब, सहकारी गृहरचना संस्था, शाळा व महाविद्यालये, खासगी आस्थापना, स्वयंसेवी संस्था अशा सहा प्रकारच्या गटासाठी यंदाच्या वर्षापासून नव्यानेच स्वच्छ पुरस्कार प्रदान करण्यात येणार होते. त्यासाठी विविध गटांत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके देण्यात येणार होती. या स्पर्धेत सौ. अनिता तांबे यांनी भाग घेतला होता. तांबे कुटुंब गेल्या १० वर्षांपासून तीन प्रकारचे घन-कचरा व्यवस्थापनेचे प्रकल्प कार्यक्षमतेने यशस्वीरीत्या राबवत आहेत आणि म्हणून या स्पर्धेसाठी त्यांनी त्यांचे नाव दिले होते. (ओल्या कचऱ्यातून मातीविरहित जैविक बाग, बायो-गॅस निर्मिती आणि गांडूळखत निर्मिती) सौ. अनिता तांबे ह्यांना कुटुंब गटातील दुसरा रु. २५,०००/- चा रोख पुरस्कार दि. २ ऑक्टोबर रोजी पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या देखण्या समारंभात मा. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

श्री. प्रमोद ल. तांबे, दूरध्वनी क्र. (०२०) २४४७ ४७८३, भ्रमणध्वनी क्र. ८४४६३ ५३८०५, मेल आय. डी. : pltambe@yahoo.co.in

With Best Compliments

Dynamic Engineers

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

फणसळकर
कोंकण काजू



कोकण काजू सांडगी मिरची
फणस-तळलेले गरे काजूकतली

उत्पादक :
प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर
मु. पो. - आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१

# सुंदर बोधकथा



एकदा भगवान श्रीकृष्ण, बलराम आणि सात्यकी हे तिघे जंगलातून जात असताना रात्रीच्या वेळी काहीच न कळल्याने रस्ता चुकले. जंगल घनदाट होते. तेथे ना पुढे जाण्याचा मार्ग दिसत होता, ना मागे येण्याचा. तेव्हा तिघांनीही असा निर्णय घेतला– आता येथेच एखादी सुरक्षित जागा पाहून विश्राम करायचा आणि सकाळी उठून मार्गस्थ व्हायचे.

तिघेही दमलेले होते, पण प्रत्येकाने थोडा-थोडा वेळ पहारा देण्याचे ठरवले. पहिली पाळी सात्यकीची होती. सात्यकी पहारा करू लागला.

तेव्हाच झाडावरून एका पिशाचाने हे पाहिले की, एक माणूस पहारा करतो आहे आणि दोघे झोपले आहेत. पिशाच झाडावरून खाली उतरले व सात्यकीला मल्लयुद्धासाठी बोलावू लागले. पिशाचाने बोलावलेले पाहून सात्यकी संतापला व क्रोधाने पिशाचावर धावून गेला. त्या क्षणी पिशाचाचा आकार बदलला व तो मोठा झाला. दोघांत तुंबळ मल्लयुद्ध झाले. पण जेव्हा-जेव्हा सात्यकीला क्रोध येई, तेव्हा तेव्हा पिशाचाचा आकार मोठा होई व ते सात्यकीला आणखीच जास्त जखमा करत असे.

एका प्रहरानंतर बलराम जागे झाले व त्यांनी सात्यकीला झोपण्यास सांगितले. सात्यकीने त्यांना पिशाचाबदल काहीच सांगितले नाही. बलरामांनाही पिशाचाने मल्लयुद्धास निमंत्रण दिले. बलराम पण क्रोधाने पिशाचाशी लढायला गेले, तर त्याचा आकार त्यांना वाढलेला दिसून आला. ते जितक्या क्रोधाने त्याला मारायला जात, तितका त्या पिशाचाचा आकार मोठा होत असे. शेवटी तोही प्रहर संपला. आता पहाऱ्याची पाळी भगवान श्रीकृष्णांची होती.

पिशाचाने मोठ्या क्रोधाने श्रीकृष्णांना आव्हान दिले, पण श्रीकृष्ण शांतपणे मंद स्मित करत त्याच्याकडे पाहत राहिले. पिशाच आणखी संतापले व मोठमोठ्याने ओरडून श्रीकृष्णांना बोलावू लागले. पण श्रीकृष्ण मंद स्मित करत, शांत भाव जपत राहिले अन् एक आश्चर्य झाले. ते म्हणजे, जसजसा पिशाचाला क्रोध येऊ लागला तसतसा त्याचा आकार लहान होत गेला! रात्र संपत गेली अन् पहाट झाली. शेवटी आकार लहान होत-होत पिशाचाचा एक छोटासा किडा झाला. श्रीकृष्णांनी त्याला आपल्या उपरण्यात अलगद बांधून ठेवले.

सकाळी सात्यकी व बलरामांनी रात्रीची कहाणी सांगताच श्रीकृष्णांनी तो किडा त्यांना दाखविला व म्हणाले, ''तुम्ही क्रोधाने याला कधीच जिंकू शकत नव्हता, कारण हे क्रोधाचे पिशाच होते. त्याला शांती हेच औषध आहे. क्रोधाने क्रोध वाढतो, मात्र त्याचा प्रतिकार हा केवळ शांतभाव प्रकटीकरणाने होतो. मी शांत राहिलो, म्हणून हे पिशाच्च बघा कसे आता या किड्यासारखे लहान होऊन बसले आहे!''

**तात्पर्य :** क्रोधावर संयमानेच विजय मिळविता येतो. क्रोधाला क्रोधाने मारता येऊ शकत नाही; तर शांतपणे-प्रेमानेच कमी करता येते, नष्ट करता येते. क्रोधाचे हे पिशाच बाहेर कोठे नसून, आपल्या विचारातच वसत असते. तेव्हा क्रोधाला आवर घालून त्यावर विजय मिळविणे हा सुखी जीवनाचा मूलमंत्र आहे.

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा
सौ. अंजली आंबर्डेकर - मो. ९८१९८८५६६५


सुगंधित, तेजोमय वातावरण,
आनंददायी करी देवपूजन!
पितांबरी®
ॲग्रिकेअर डिविजन
देवभक्ती®
अगरबत्ती
चाफा
लव्हेंडर
मोगरा
केवडा
गुलाब
चंदन
देवभक्ती अगरबत्ती चम्पा
देवभक्ती अगरबत्ती लवेंडर
देवभक्ती अगरबत्ती मोगरा
देवभक्ती अगरबत्ती केवडा
देवभक्ती अगरबत्ती गुलाब
देवभक्ती अगरबत्ती चंदन
Made With NATURAL Extract From Pitambari Dapoli Farms
२२ ग्रॅम
Pitambari Products Pvt. Ltd.
Thane: 022-6703 5555, CRM: 022-6703 5564, 5699, Pune: (020) 2539 0734,
7718804636,Toll free No.: 180030701044. CIN: U24239MH1989PTC051314.
NSM: 9892847421, Vidarbha: 8828200249, Khandesh: 8451907139
www.pitambari.com


FAVOLOSA
Fabulously Crafted World
2 & 3 BHK Homes @ Balewadi
Site Address - FAVOLOSA Sno 31 Balewadi Behind
Mitcon Opposite Balewadi Stadium, Pune
abhilasha
DEVELOPERS
Office Address - Ramkripa Apartments 759/17
Ramkripa Apartments Deccan Gymkhana
Champion Sports Lane Pune 411004
Contact nos - 91-20- 25652015/16



# Shrirang

Enjoy Colourfilled life @ Shrirang

**Situated right opposite the Hill Behind VED Bhavan in Kothrud**

**Site Address** - Plot number 100 Bhusari Colony Behind Ved Bhavan,S no 78/19 Pune 411038.

**2 bhk and 3 bhk luxurious flats available**

**Office Address** - Ramkripa Apartments 759/17 Ramkripa Apartments
Deccan Gymkhana Champion Sports Lane Pune 411004 Contact nos - 91-20- 25652015/16

abhilasha
CONSTRUCTION

## आरामात मांडी घालून बसण्यासाठी!

### सप्रे योगा सीट

**सुखदायक बैठक योगा सीट ₹1800/-**



- भारतीय बैठकीत आरामात मांडी घालून बसण्यासाठी
- गायक, वादक व रसिक श्रोत्यांना भारतीय बैठकीसाठी.
- पौराहित्य करणाऱ्यांसाठी
- पोथीचे पारायण किंवा जास्त वेळ एका जागी
- मांडी घालून बसून वाचन करणाऱ्यांसाठी.
- मेडीटेशनसाठी
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके

## तुमचा हक्काचा पाठीराखा!

### सप्रे बॅकगार्ड

| | |
|---|---|
| Curved Back Guard ₹ **3290** | |
| Curved Magnetic Back Guard ₹ **4150** | |



पाठदुखीच्या त्रासातून मुक्तीसाठी हमखास उपाय. रोज ऑफिसमध्ये खुर्चीवर बसून काम करण्याने कित्येगदा पाठदुखीचा त्रास संभवतो. दरोरोज काम करताना बॅकगार्ड वापरल्यास हा त्रास होणार नाही.

- जास्तवेळ चारचाकी वाहन चालवणाऱ्यांसाठी.
- खूप वेळ खुर्चीत बसून काम करणाऱ्यांसाठी
- कुठल्याही खुर्चीवर ठेवता येते.
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके
- पाठीच्या मणक्याच्या त्रासापासून मुक्ती.

## सप्रे बोर्ड्स्

पहिला मजला, चित्रशाळा भवन, भानुविलास चौक,
विजय टॉकिजच्या अलिकडे, लक्ष्मी रोड, पुणे 30.
फोन : 020 - 2445 9149, 93710 15193, 93728 50944
वेळ : सकाळी 10.30 ते 2 दुपारी 4.30 ते 8
www.saprepune.com
परगावच्या ग्राहकांनी कुरियरचे ₹ **350/-** जास्तीचे पाठवावे.

* वरील किमती ६ महिन्याकरिता वैध

# संस्थावृत्त

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे




संस्थेचा कोजागरीनिमित्त होणारा कार्यक्रम प्रथमच तिथीनुसार करण्यात आला. दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी श्रुती मंगल कार्यालय येथे संध्याकाळी पाच ते साडेआठ या वेळेत तो संपन्न झाला.

सुरुवातीला ५ ते ५।। ह्या वेळेत दुग्धपानाचा कार्यक्रम झाला. नंतर 'वृषस्वर' प्रस्तुत 'चांदण्यात फिरताना' हा सौ. वृषाली मावळकर ह्यांचा मराठी–हिंदी सुगम संगीताचा कार्यक्रम झाला. 'जिवलगा, कधी रे येशील तू?' ह्या 'सुवासिनी' चित्रपटातील वसंत ह्या पाच रागावर आधारित असलेल्या गाण्याने सुरुवात झाली. नंतर 'हृदयी प्रीत जागते' हे त्याच चित्रपटातील गीत झाले. अशी ४–५ गाणी सादर झाल्यावर 'ओ सजना, हे 'परख' ह्या हिंदी चित्रपटातील गीत सादर केले. 'सलोनासा सजन' गझल झाल्यावर 'गाईड' ह्या चित्रपटातील 'पिया तोसे नैना लागे रे' ह्या गाण्याने कार्यक्रमाची लज्जत अधिकच वाढली. 'निगाहे मिलानेकों जी चाहता है' ह्या 'दिल हि तो है' ह्या चित्रपटातील कव्वालीने सर्व श्रोते/प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन गेले. 'चंद्र आहे साक्षीला' ह्या वृषाली व अभय गोखले ह्यांनी गायिलेल्या गीतानंतर मला 'जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा' ह्या 'नटरंग' चित्रपटातील लावणीने 'चांदण्यात फिरताना' ह्या कार्यक्रमाची सांगता झाली.

संध्याकाळी साडेसात वाजता पुण्याचे महापौर श्री. प्रशांत जगताप व नगरसचिव श्री. सुनील पारखी ह्यांचे आगमन झाले. ह्या दोघांनी पुणे महानगरपालिकेच्या दफ्तरी झाशीच्या राणीच्या स्मृतिदिनाची तारीख १८ जून नोंद करण्यासाठी खूप मदत केली व सहकार्य केले. त्यानिमित्त त्यांचा श्री. लक्ष्मीकांत देसाई, अध्यक्ष, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे याआधीचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर यांनी स्मृतिदिनाची तारीख १८ जून करण्यासाठी गेली चार वर्षे बरेच प्रयत्न केले, त्याचे हे फलित आहे. वार्ताहर क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल श्री. आशुतोष चांदोरकर, वार्ताहर, महाराष्ट्र टाइम्स; सायली पेंढारकर ह्यांचा राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय जलतरणातील विशेष कामगिरीबद्दल, लीना खांडेकर ह्यांचा स्पा–तंत्रात विशेष प्रावीण्य मिळविल्याबद्दल महापौर श्री. प्रशांत जगताप ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी १० वी, १२ वी, पदविका–पदवीमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले, त्यांचा महापौर, नगरसचिव व श्री. लक्ष्मीकांत देसाई ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

सौ. मुक्ता चांदोरकर ह्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास कार्यकारी मंडळाचे सर्व सभासद व संघाचे सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. पसायदान झाल्यावर भोजनोत्तर कार्यक्रमाची सांगता झाली.

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री. विठ्ठल गोविंद देव – मो. ९८६९५६७८५०

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे




रविवार, दिनांक २०/११/२०१६ रोजी दुपारी ४.३० ते संध्याकाळी ७.३० या वेळेत मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात कऱ्हाडे गौरवदिन साजरा करण्यात आला.

सरस्वती सेकंडरी हायस्कूल-मराठी माध्यमाच्या खालील ३ मुलींचा पुण्याहून आलेले प्रमुख पाहुणे कर्नल (निवृत्त) श्री. अनिल अनंत आठले ह्यांच्या हस्ते प्रत्येकी; स्मृतिचिन्ह, १०००/- रुपये व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व कौतुक करण्यात आले. विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांनाही आमंत्रण देण्यात आले होते.

१) कु. जुई महेश देशपांडे - ६ वी (क)
- कराटेमध्ये राज्यस्तरावर नैपुण्य

२) कु. जुई हेमंत गावडे - ६ वी (ब)
- ऱ्हिदमिक जिम्नॅस्ट प्रकारात राज्यस्तरावर नैपुण्य .

३) कु. अनन्या वरदराज बापट- ७ वी (ड)
- क्लासिकल जिम्नॅस्ट प्रकारात राष्ट्रीय पातळीवर नैपुण्य.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणेची सभासद कु. ऋचा बोरवणकरने रणरागिणी व स्वातंत्र्यसेनानी झाँसीच्या राणीसाहेबांचं चरित्र विस्ताराने कथन केले.

प्रमुख पाहुणे कर्नल अनिल अनंत आठले यांनी 'काश्मीरच्या डोकेदुखीवर उपाय काय?' या विषयावर ऑडिओ-व्हिज्युअलद्वारे सखोल प्रबोधन केले. त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली व नंतर अल्पोपाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

सुरुवातीला 'कऱ्हाडे गौरवदिन' साजरा करण्यामागची संपूर्ण पूर्वपीठिका श्रोतृवर्गाला महासंघाच्या मीटिंगमध्ये ठरल्याप्रमाणे विशद केली.

हा कार्यक्रम महासंघ व ठाणे संघ ह्या दोघांच्या संयुक्त विद्यमाने झाल्यामुळे तसे उद्धृत केले व विद्यार्थिनींना दिलेल्या स्मृतिचिन्हात महासंघाच्या एम्ब्लेमचे, संपर्क त्रैमासिकावरील झाँसीच्या राणीसाहेबांच्या एम्ब्लेमचे, कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे व कऱ्हाडे गौरवदिन (१९/११/२०१६) चे स्टिकर्स लावले होते.

**श्री. संजय आंबर्डेकर**

## आवाहन

नमस्कार,

काही सभासदांनी त्यांना 'अंक मिळत नाहीत' अशी तक्रार केली होती; त्यावर महासंघाने ज्या शहरातील तक्रारी होत्या, त्यांना तिकीट लावून संघाकडे कुरिअरने अंक पाठवायला सुरुवात केली आणि तक्रारी कमी झाल्या. एप्रिल २०१७ पासून सर्व सभासदांना अंक पाठवल्याचा एसएमएस पाठवण्याची पद्धत सुरू करण्याचा विचार आहे. सर्व सभासदांनी आपल्या शहर प्रतिनिधीकडे खालीलप्रमाणे माहिती लेखी कळवावी.

१) सभासदाचे नाव २) सभासद क्र. ३) शहराचे नाव ४) मोबाईल क्र. ५) ई-मेल आयडी माहितीचे संकलन करून ती माहिती शहर प्रतिनिधींनी मुख्य कार्यालयात पाठवावी. ही व्यवस्था सुरू झाली की, तक्रारी आपोआप बंद होतील. सर्व सभासदांना विनंती की, कृपया वरील माहिती देऊन सहकार्य करावे.

आपला विश्वासू,
**सचिव,**
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्रीमती सुनंदा लक्ष्मीकांत किर्लोस्कर - मो. ९८२०१६४५७७**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक

एकोणीस नोव्हेंबर ह्या राणी लक्ष्मीबाई यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून वनवासी व दुर्बल घटक विविध सेवा प्रकल्प न्यास संचालित कन्या छात्रालय, हरसूल ता. त्र्यंबक, जिल्हा– नाशिक येथे संघाचे पदाधिकारी यांनी दि. १९/११/२०१६ रोजी भेट दिली. संघातर्फे मुलींच्या शिक्षणासाठी कन्या छात्रालयास राणी लक्ष्मीबाई कन्या शैक्षणिक दत्तक योजनेअंतर्गत १२ सदस्यांचे अनुदान म्हणून संघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र ताटके यांचे हस्ते कन्या छात्रालयाचे श्री. हेरंब गोविलकर यांना कार्यकारिणी सचिव श्री. सुरेश जठार, कार्यकारिणी सदस्य श्री. सुनील खेर, संघाचे सभासद श्री. व सौ. दिलीप खंडकर यांच्या उपस्थितीत रु. ७२०००/– धनादेश देण्यात आला. श्री. गोविलकरांनी आभार मानून छात्रालयास अशा मदतीची फार गरज असल्याचे नमूद केले.

सुमुख इन्शुरन्स सर्व्हिसेसतर्फे श्री. सुनील खेर यांनी छात्रालयास मुलींच्या प्रशिक्षणासाठी संगणकप्रणाली भेट दिली. छात्रालयातील मुलींनी गीतेतील १५ वा अध्यायाचे सादरीकरण केले. उपस्थित मुलींबरोबर राणी लक्ष्मीबाई यांच्याबाबत माहिती शेअर केली. छात्रालयातील मुलींबरोबर जेवणाचा आस्वाद घेताना एक वेगळा आनंद मिळाला.

**श्री. नरेंद्र ताटके**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई यांच्या वतीने शनिवार, दिनांक १९ नोव्हेंबर २०१६ रोजी राणी लक्ष्मीबाई यांचा जन्मदिवस 'गौरवदिन' म्हणून मुंबई संघाच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. या समारंभात आर्यन एज्युकेशन सोसायटी हायस्कूलमधील ५ वीतील कुमारी चैताली प्रकाश पावसकर, ६ वीतील कुमारी सिद्धी सुधाकर जावळे तसेच इयत्ता ७ वीतील कुमारी सलोनी दिनेश साळवे या विद्यार्थिनींचा खेळातील नैपुण्याबद्दल सन्मानपत्र, तसेच रुपये १००१/–चे पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. खेळाला उत्तेजन देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिल्याबद्दल गिरगावातील आर्यन एज्युकेशन सोसायटी हायस्कूलला राणी लक्ष्मीबाई गौरव स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबई संघाचे अध्यक्ष श्री. सुहास ढवळे, कार्याध्यक्ष व महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर तसेच मुंबई संघाचे कार्यवाह श्री. श्रीराम देव यांच्या शुभ हस्ते पारितोषिक सोहळा संपन्न झाला. आर्यन एज्युकेशन सोसायटी हायस्कूलचे श्री. सोलकर सर समारंभाला शाळेच्या वतीने उपस्थित होते.

राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनाबद्दल मुंबई संघातील कार्यकारिणी सदस्य श्री. हर्डीकर यांनी उपस्थितांना विद्वत्तापूर्ण माहिती अवगत करून दिली. कार्यकारिणीचे सदस्य डॉ. पाटगावकर यांनी मुलांना तसेच श्रोतृवर्गाला मार्गदर्शन केले.

श्री. हेमंत किर्लोस्कर, श्री. दीपक पराडकर, श्री. अतुल तांबे सौ. भाग्यश्री सरपोतदार व सौ. अमृता किर्लोस्कर यांनी समारंभाचे आयोजन व व्यवस्था केली. संघाचे सर्व कार्यकारिणी सदस्य, तसेच सर्व कार्यकर्त्यांनी कुटुंबीयांसोबत उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला. शेखर मावळंकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. समारंभाचा समारोप अल्पोपाहाराने करण्यात आला.

**श्री. विजय आंबर्डेकर**

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. श्रीगजानन वा. गुर्जर – मो. ८८०६३९५८८०**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे



## झांशी राणी लक्ष्मीबाई गौरवदिन

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांच्या वतीने गुरुवार, दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी राणी लक्ष्मीबाई यांचा जन्मदिवस (एकोणीस नोव्हेंबर) 'गौरवदिवस' म्हणून पुण्यात मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर, येथे साजरा करण्यात आला.

शाळेच्या गॅदरिंगच्या पहिल्याच दिवशी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे व महासंघाच्या विद्यमाने या 'गौरवदिना'चे औचित्य साधून, विशेष प्रावीण्य दाखविल्याबद्दल 'झाशी राणी जयंती पुरस्कार -२०१६' देऊन शाळेतील खालील वैयक्तिक व गटातील विद्यार्थिनींना गौरविण्यात आले.

१) गायत्री किशोर सूर्यवंशी - १०वी ड - फाईल प्रकार - प्रथम क्रमांक

२) पूर्वा निरेन देवकर - १०वी क - सेव्हर प्रकार - तृतीय क्रमांक

३) घोष पथक

४) एम. सी. सी. पथक

५) आर. एस. पी. पथक. तसेच संबंधित मुलींना प्रत्येकी रु.१००१ चा धनादेश देण्यात आला.

सुरुवातीला शाळेतील मुलींनी गॅदरिंगसाठी पाहुणे म्हणून आलेल्या, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ व क. ब्रा. संघ-पुणे संघाच्या सदस्यांना व रविशंकर ग्रुपच्या सदस्यांना घोषपथकासहित शाळेच्या मैदानावर मानवंदना दिली. त्यानंतर व्यासपीठावर कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर व क. ब्रा. संघ-पुणेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ढगे यांनी आमंत्रित करून त्यांचा योग्य तो सत्कार करण्यात आला आणि नंतर त्यांच्या हस्ते झांशी राणी जयंती पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी मार्गदर्शनपर बोलताना श्री. गणेश गुर्जर यांनी झांशी राणीच्या पराक्रमाचे वर्णन करून उपस्थित विद्यार्थिनींना राणींच्या ग्वाल्हेर येथील स्मृतिस्थळाबद्दल माहिती दिली. पुणे संघाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी आपले विचार प्रकट करताना, सध्याच्या काळात स्त्रियांना सर्व क्षेत्रांत असलेल्या संधींचा उल्लेख करून पी. टी. उषा, पी. व्ही. सिंधू, सायना नेहवाल, अरुंधती भट्टाचार्य, कल्पना चावला आदी स्त्रियांनी निरनिराळ्या क्षेत्रांत केलेली उत्तुंग कामगिरी अधोरेखित केली. विद्यार्थिनींनी अशीच नेत्रदीपक प्रगती करून देशाच्या प्रगतीमध्ये आपला खारीचा वाटा उचलून हातभार लावण्याचे आवाहन केले.

यानंतर झांशी राणीच्या पराक्रमापासून स्फूर्ती घेऊन शाळेच्या काही विद्यार्थिनींनी 'तलवारबाजी'ची उत्तम प्रात्यक्षिके सादर केली आणि प्रेक्षकांची दाद मिळवली. तसेच देशभक्तिपर आधारित पोवाडे, नृत्य आणि कोळीगीत नृत्यप्रकार सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

या कार्यक्रमाला कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे सुहास खानवलकर (उपाध्यक्ष), श्रीगजानन गुर्जर (संपादक : संपर्क), नंदकुमार सप्रे, सौ. मुक्ता चांदोरकर, श्रीकांत गुर्जर उपस्थित होते. शाळेच्या वतीने सर्वांचे यथायोग्य स्वागत या प्रसंगी करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ढगे आणि इतर शिक्षकवृंद यांनी खूपच मेहनत घेऊन कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले होते. तसेच कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने प्रथमच जाहीर केलेला झांशी राणी गौरवदिन, क. ब्रा. पुणे संघाने मुलींच्या शाळेत जाऊन नैपुण्य दाखविलेल्या मुलींचे कौतुक करून साजरा करण्याची प्रथा यानिमित्ताने सुरू केली.

**श्रीगजानन गुर्जर**
कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. गोपाळ भास्कर भाटवडेकर - मो. ९८५०९७९७०६**

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर

कऱ्हाडे ब्राह्मण संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदिर, कोल्हापूर येथे दि. २१ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता पार पडली. सभेला आवश्यक असणारा कोरम ५.३० नंतर पूर्ण झाला व सभेस सुरुवात झाली. अध्यक्ष सौ. अनुराधा गुणे यांनी सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या सर्व घडामोडींचा आढावा घेतला. कार्यवाह श्री. धर्मराज पंडित यांनी विषयपत्रिकेनुसार अहवाल वाचन केले.

अहवालास अनुसरून सभासदांनी विचारलेल्या प्रश्नाला अध्यक्ष व कार्यवाह यांनी खुलासेवार उत्तरे दिली. त्यामुळे सभासदांचे समाधान झाले. कोषाध्यक्ष श्री. आनंद खंडकर यांनी अहवाल वर्षात झालेला जमा-खर्च, नफा-तोटा पत्रक, अंदाजपत्रक इत्यादी आर्थिक व्यवहारास मंजुरी घेतली. अहवालवाचन व हिशोबपत्रके झाल्यानंतर २०१६ ते २०२१ करिता पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल निवडणूक अधिकारी ॲडव्होकेट श्री. पी. जी. सरवटे यांनी जाहीर करून कार्यकारिणी जाहीर केली. ती खालीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष | सौ. अनुराधा प्र. गुणे |
| २) | उपाध्यक्ष | श्री. मिलिंद रा. पावनगडकर |
| ३) | कार्यवाह | श्री. धर्मराज सु. पंडित |
| ४) | कोषाध्यक्ष | श्री. आनंद ल. खंडकर |
| ५) | सहकार्यवाह | श्री. अजित कारखानीस |
| ६) | सहकोषाध्यक्ष | श्री. नितेश भा. जोशी |
| ७) | सदस्य | श्रीमती शांता पाध्ये |
| ८) | सदस्य | श्री. मेघश्याम मणेरीकर |
| ९) | सदस्य | ॲड. सौ. स्मिता दीक्षित |
| १०) | सदस्य | श्री. अनिरुद्ध जावडेकर |
| ११) | सदस्य | सौ. अश्विनी तांबे |
| १२) | निमंत्रित सदस्य (आर्थिक सल्लागार) | श्री. रामचंद्र टोपकर |

वरीलप्रमाणे कार्यकारिणी जाहीर केल्यानंतर उपाध्यक्ष श्री. मिलिंद रा. पावनगडकर यांनी आभार मानले व चहापानानंतर सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर संस्थेचा गुणवत्तापात्र विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ**

दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम येथे कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अजित कशाळकर व सौ. चित्रा कशाळकर होते. त्यांच्या हस्ते पारितोषिक वितरित करण्यात आली.

संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा प्र. गुणे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. सौ. अनुराधा प्र. गुणे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून पारितोषिक वितरण कार्यक्रमाबद्दल व मान्यवरांच्या सत्काराबद्दल माहिती सांगितली. विद्यार्थी यादीवाचन सहकार्यवाह श्री. अजित कारखानीस यांनी केले; तर सौ. अश्विनी तांबे, श्री. नितेश जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

याच वेळी कऱ्हाडे ब्राह्मण संघातील पौराहित्य करणारे पुरोहित, आदर्श दांपत्य, आदर्श स्त्री, आदर्श पुरुष, संघ कार्यकर्ता, तरुण उद्योजक आदींचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी श्री. अजित कशाळकर व सौ. चित्रा कशाळकर यांनी पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांना शिक्षणक्षेत्राशी निगडित मार्गदर्शनपर चार शब्द सांगितले. अध्यक्ष सौ. अनुराधा गुणे यांनी नवी शिष्यवृत्ती जाहीर केली व नवीन शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थिनी कु. नेहा अशोक भागवत हिला शिष्यवृत्तीचा चेक प्रदान करण्यात आला. काही ज्येष्ठ सत्कारमूर्तींनी कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या कार्याबद्दल चार शब्द सांगितले. यानंतर पसायदान झाले. श्री. मिलिंद पावनगडकर यांनी आभार मानले व कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

**श्री. मिलिंद पावनगडकर**

## सुभाषितांचा खजिना

**। उपभोगकातराणां पुरुषानां अर्थसंचय परायणानां ।**
**। कन्यारत्नमिव गृहे तिष्ठंत्यार्था: परस्यार्थे।**

Greedy people hoard their cash not knowing it is like raising daughter : you bring them up with love, only to go to someone else's household. So is hoarded cash.

**। संचितं क्रितुषु नोपयुज्यते याचितं गुणवते न दीयते।**
**। तत् कदर्य परिककरक्षितं धनं चौरपार्थिव गृहेषु गच्छति।**

The hoarded money neither spent for one's enjoyment nor donated to a worthy cause, is only waiting to either rot in the belly of earth or to go to the houses of thieves. Don't hoard : enjoy or donate.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, रत्नागिरी



कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे पुरस्कार वितरण कार्यक्रमात नगराध्यक्ष राहुल पंडित यांचा सत्कार करताना चंद्रकांत हळबे. (डावीकडून) पुरस्कारविजेते विवेक भोपटकर, विश्वनाथ भाट्येबुवा, सुनील भाटवडेकर, डॉ. तोरल शिंदे, सुनील जायदे आदी.

''रत्नागिरीमध्ये पर्यटक राहिला पाहिजे, या हेतूने रत्नागिरीचे 'ॲप' सुरू करण्याचा विचार आहे. तसेच स्पर्धा घेऊन रत्नागिरीचा लोगोसुद्धा प्रसिद्ध करू, शहरातील विविध ऐतिहासिक ठिकाणी फलक लावू. भगवती किल्ल्यावरील उजाड उद्यानाचा विकास करतानाच लेसर शो सुरू करण्याचा प्रयत्न आहे. आता रत्नागिरीत नक्कीच बदल घडेल'', असे प्रतिपादन नूतन नगराध्यक्ष राहुल पंडित यांनी केले.

कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. संघाच्या राणी लक्ष्मीबाई सभागृहात हा कार्यक्रम झाला. राहुल पंडित यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले, ''उमेदवारी जाहीर होणे, प्रचार, निकाल या सर्वांची उत्सुकता व थोडे टेन्शन होते. पण रत्नागिरीकरांनी मला निवडून दिले. शहरातील समस्या सोडविण्यासाठी मी प्राधान्य देण्याच्या कामाची यादीही बरीच मोठी आहे. पालिका कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या चांगल्या कामातून जनतेत सुसंवाद राखून पुन्हा एकदा विश्वास संपादन करू. हळूहळू बदल नक्कीच होईल.''

'लोकमान्य टिळक आणि स्वा. सावरकर यांच्यावर आधारित लेसर शो रत्नागिरीत व्हावा, जेणेकरून पर्यटकांना आकृष्ट करता येईल', अशी विनंती डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी नगराध्यक्ष पंडित यांना केली. तसेच पर्यटनवाढीसाठी गाईड प्रशिक्षण कार्यक्रम व्हावा, असेही आवाहन केले.

या वेळी अध्यक्ष चंद्रकांत हळबे, उपाध्यक्ष डॉ. शरद प्रभुदेसाई, कार्यवाह अर्चना लळित वगैरे उपस्थित होते.

**चविष्ट चारोळ्या**

**आपलं कुणाशी पटलं नाही**
**की तो माणूस फालतू.**
**त्यानेच पुढे मदत केली**
**की चौकशी 'कसा आहेस तू'!**

**नळाचं पाणी गेलं**
**की एकत्र येतात सारेजण.**
**आपलं पाणी भरून झालं**
**की हळूच कटतो एकेकजण!**


॥ रेशीम गांठी ॥ ®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन
वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य आणि
परिचय मेळावे

# With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

## An ISO 9001 : 2008 Certified Company


PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664
E-mail: phibgm@gmail.com


**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.



DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10

Fabricated Parts
Manifold Exhaust, Silencers, Pipe bends, Air Cleaner Assembly etc..



**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450

OKUMA HMC
MA-600 HB



HAAS TURNING CENTRE



HAAS VMC
VF3YT




**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)


**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Antivirus Software
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers
- Customised Software Development

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
shantanu@sdsenterprises.net

चटक – मटक – चटणी – चटक ...

## आवळ्याची चटकदार टिकाऊ चटणी






आवळ्याचा हंगाम म्हणजे आत्ता चालू असलेला थंडीचा मोसम! आवळ्याला 'धात्री' (म्हणजे– आरोग्याची देवता आणि आईसारखी काळजी घेणारा) असे संबोधले जाते.

रोजच खाता येणारा आवळ्याचा एक चवदार टिकाऊ प्रकार म्हणजे हमखास चांगली होणारी आवळा चटणी! या चटणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आयुर्वेदामध्ये मानल्या गेलेल्या सहा चवींनी ती समृद्ध आहे (गोड–गूळ, कडू–मेथी, आंबट–आवळा, तिखट–मिरीपूड आणि मिरचीपूड, तुरट–आवळा, खारट–मीठ). त्यातली मेथी, दालचिनी, मिरे आणि बडीशेप यामुळे चविष्ट तर होतेच; त्याशिवाय टिकाऊ आणि अन्नपचन करण्यास उपयुक्त व थंडीसाठी औषधी गुणांची होते. अजिबात तेल नाही हं!

**साहित्य –**

आवळे : अर्धा किलो
गुळ : अर्धा ते पाऊण किलो
बडीशेप : दोन टी–स्पून शीग लावून
मिरपूड : अर्धा टी–स्पून
दालचिनी : छोटे तुकडे दोन टी स्पून
मेथी : एक टी–स्पून
लाल मिरची पूड : एक टी–स्पून
मीठ : चवीप्रमाणे

**कृती–**

१) आवळे धुऊन, पुसून घ्यावेत. एका स्टीलच्या जाड बुडाच्या पातेल्यात आवळे बुडतील एवढेच पाणी घालून उकडून घ्यावेत. साधारण १५ मिनिटे लागतील. आवळ्याच्या फाका (फोडी) सुट्या होताना दिसतील.

२) गार झाल्यावर बियांपासून फोडी सुट्या करून घ्याव्यात.

३) आवळे उकडलेले पाणी वापरून स्टीलच्या पातेल्यात/कढईत गूळ घालून पाक करायला ठेवावा.

४) बडीशेप, मेथी थोडी भाजून घ्यावी.

५) मिक्सरच्या छोट्या भांड्यात भाजलेली बडीशेप, मेथी, दालचिनी (भाजलेली) यांची पूड करून घ्यावी.

६) आवळ्याच्या फोडी थोड्या गरम असतानाच मिक्सरमध्ये वाटून 'पल्प' करून घ्याव्यात. गार झाल्यावर पटकन वाटल्या जात नाहीत.

७) गुळाचा पाक होताना कढईमध्ये बुडबुडे खूप वेगाने येतात. कढई भरून बुडबुडे वर येऊ लागले की, आवळ्याचा वाटलेला गर (पल्प) टाकावा.

८) भाजलेली मेथी, भाजलेली बडीशेप, दालचिनी यांची पुड, तसेच मिरीपूड, तिखट, मीठ घालावे.

९) सतत ढवळत राहावे.

१०) ढवळताना मिश्रणाचे थेंब चट–चट असे कढई बाहेर उडू लागतात. मिश्रण बाहेर उडण्याचे प्रमाण हळूहळू कमी होते.

११) लालसर–सोनेरी रंग आला आणि जामसारखे घट्ट होत आले की, झाली आपली चटणी.

१२) गार झाल्यावर काचेच्या अथवा चिनी मातीच्या बरणीत भरून ठेवावी.

आंबट–तिखट आणि माफक मसाल्यांचा स्वाद असणारी चटक–मटक चटणी तय्यार! चांगली खूप दिवस टिकते.

**टीप :**

प्रमाण आपल्या आवडीप्रमाणे कमी–जास्त झाले तरी चटणी हमखास चांगली होते, असा अनुभव आहे! आणि हो.. तेल नसल्याने सगळ्यांना चालते.

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. अविनाश जावडेकर – मो. ९८६०२५७३१५**

## WITH BEST COMPLIMENT FROM:

# J.P.F METACAST PVT LTD





PLOT NO. 7, 16, 29 MACCHE INDUSTRIAL ESTATE
BELGAUM - 590014 KARNATAKA, INDIA
Ph: 0831-2440664 Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com
www.jpfmetacast.com

TÜV SÜD ISO 9001

***Manufacturers of all types of Cast iron and Ductile Iron castings***

- An ISO 9001 : 2008 certified company
- Winner of National Quality Award in SSI - 1998
- Winner of Rajeev Gandhi National Quality Award - 2007
- Winner of Jayaswal Neco Best Quality award from Institute of Indian Foundrymen - 2012
- Winner for Best Operations Management from S.P.Jain Institute of Management and Research, Mumbai 2014

**Industries Served :** Diesel Engines, Tractors, Compressors, Road construction Machineries, Machine Tools ,etc


VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN
- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com
Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032
Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२
भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

## वसुधा एंटरप्रायजेस

इंटिरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टॅंक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



## निकेत फोटोज्

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे - ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

※ अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी
घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा



*With Best Compliments from,*

REINDEER

## Reindeer Apparels

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com



## लग्नकर्तव्य विवाह संस्था

(फक्त ब्राह्मणांसाठी)



सर्व प्रकारच्या स्थळांकरीता भरपूर स्थळे,
माफक नोंदणी शुल्क, वैयक्तिक लक्ष,
अनुरुप स्थळांकरीता संपर्क करा

सौ. अश्विनी भाटवडेकर

ए/२/६, मिहिर रामबाग कॉलनी,
न्यू सदाशिव पेठ,
ज्ञानल मंगल कार्यालयाजवळ,
पुणे ४११ ०३०.
मो. नं. : ९५२७४४७४२०
ई-मेल: vrinda031975@gmail.com

# अशी ही जगन्नाथाची गाथा

प्रत्येक जण आपला 'टिपकागद' घेऊन जन्माला येतो. प्रत्येकाचा टिपकागद कमी-अधिक क्षमतेचा असतो. त्या-त्या व्यक्तीच्या आठवणी हा टिपकागद अलगदपणे टिपून आपल्यात सामावून घेतो. त्याच मनाच्या टिपकागदावर टिपलेली एक आठवण.

मध्यंतरी मी जितेंद्र जोशींचा 'संत तुकाराम' हा सिनेमा पाहिला. तुकारामांना आपले अभंग, गाथा, सर्व ग्रंथसंपदा इंद्रायणीत बुडवावी लागते. तुकाराममहाराज उदास, दु:खी मन:स्थितीत बसून राहतात. त्यांचे भक्तगण, चाहतेमंडळी त्यांच्या कुटुंबाबरोबर बसलेली असतात. परमेश्वराचं नामस्मरण, 'जय जय पांडुरंग हरी'चा अखंड जप चालू असतो. इतक्यात एक-एक भक्त तुकारामांच्या अभंगाचा एक चरण गाऊ लागतो.

याचा अर्थ एवढाच- जरी तुकारामांची ग्रंथसंपदा इंद्रायणीत बुडाली असली तरी लोकांच्या मन:पटलावर, मुखात ती अविरत घोळत होती. तुकारामांची ग्रंथसंपदा जिवंत आहे, हेच त्यातून लक्षात येते.

हा किस्सा एवढ्याचसाठी सांगितला... माझे वडील संगीतभूषण पं. राम मराठे यांचे गुरू गुनिदास ऊर्फ पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा मुंबईत त्यांच्या शिष्यवर्गाने, मित्रमंडळींनी मोठ्या दिमाखात साजरा केला. दोन दिवस भरगच्च कार्यक्रम होता. अनेक नामवंत कार्यक्रमाला हजर होते. पं. राम मराठे, पं. सी. आर. व्यास,



पं. जितेंद्र अभिषेकी, पं. प्रभुदेव सरदार, पं. वसंतराव कुलकर्णी, यशवंतबुवा जोशी, भाई गायतोंडे, जी. एन. जोशी, माणिक वर्मा, कुंदा वेलिंग, सुमन माटे, लीलाताई करंबेळकर, पूर्णिमा तळवलकर (शरद तळवलकरांच्या मिसेस), सुशीलाबाई नंजुदैया अशी दिग्गज शिष्यांची मांदियाळी आपल्या गुरूच्या कौतुक सोहळ्यास हजर होती. प्रत्येकाने आपली कला सादर केली.

गुनिदास जगन्नाथबुवा हे कोल्हापूरचे, म्हणून त्यांचा सत्कार सोहळा कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये आयोजित केला होता. बुवांबरोबर बहुतेक सर्व शिष्यमंडळी कोल्हापूरला सत्कार सोहळ्यासाठी गेली. रात्री रेल्वेच्या डब्यात सर्व शिष्यमंडळी व बुवा यांच्या गप्पा सुरू झाल्या. गप्पा अर्थातच गाण्यावरच्या. कोल्हापूरला जाताना बुवांनी आपल्या चीजांच्या वह्याही बरोबर घेतल्या होत्या. बऱ्याच उशिरापर्यंत सर्वांच्या गप्पा चालू होत्या.

सकाळी कोल्हापूरला सर्व जण उतरले. बुवा डब्यातच वह्या विसरले. खूप शोधाशोध केली, पण वह्या मिळाल्या नाहीत.

बुवांनी आयुष्यात पैशाचा संचय केला नाही, पण संगीतातल्या अनमोल चीजा-बंदिशी ह्यांचा एक संचय, तर दुसरा अनेक मित्रमंडळींचा.

बुवांसहित सर्व जण बेचैन, चिंतेत. या सर्व शिष्यमंडळींची मीटिंग झाली. प्रत्येकाने बुवांनी शिकवलेल्या चीजा लिहून काढायच्या, असं ठरलं- भले त्या डबल झाल्या तरी चालेल, पण सगळ्या एकत्र करून बुवांना लिहून द्यायच्या. एकाला शिकवलेली चीज दुसऱ्याला शिकवलेली असेलच, असे नाही. सर्व जण आपापल्या व्यवसायात व्यग्र. म्हणून ही वहीची युक्ती. बुवांनी कधीच हातचं राखून शिकवलं नाही.

बुवांना त्या वह्या दिल्या मात्र... बुवांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहू लागला. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. जितेंद्र जोशींच्या 'तुकाराम' मधला तो प्रसंग पाहिला आणि माझ्या मनाच्या टिपकागदावर टिपलेली आठवण पुन्हा टवटवीत झाली.

तर वाचक हो, अशी ही 'जगन्नाथाची गाथा'!

**सौ. वीणा प्रदीप नाटेकर**
फोन: ०२२-२१६३७२२८,
मो. ९८९२९८९०२८

**चविष्ट चारोळ्या**

**बीज भार नियमनामुळे**
**एक सुखद गोष्ट घडली**
**ब्लॉकमध्ये राहणाऱ्यांची**
**खिडक्या, दारे उघडली**

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
**श्री. गणेश गुर्जर - मो. ९८९०९९०११३**

# न्यूनगंड - पुनरावलोकन

एका खेड्यात एक शेतकरी रोज शेतातल्या विहिरीतून पाणी भरून घेऊन घरी यायचा. यासाठी तो दोन बादल्या काठीला बांधून नेत असे. विहिरीवर दोन्ही बादल्या भरून तो घरी जायला निघे. मात्र त्यातील डाव्या बाजूच्या बादलीच्या तळाशी एक बारीक छिद्र पडलेले असल्याने त्यातून थेंब-थेंब पाणी गळायचे. शेतातून घरी जाईपर्यंत त्या छिद्रवाल्या बादलीतून निम्मे पाणी वाटेत सांडून जायचे. असे रोज व्हायचे.



एके दिवशी त्या गळक्या बादलीकडे पाहून चांगलीवाली बादली म्हणाली, ''बघ, मी किती मालकाच्या उपयोगी पडते. पूर्ण पाणी त्याच्या घरापर्यंत नेते. नाही तर तू पाहा- निम्मे पाणी वाटेत सांडत येते.'' हे ऐकून त्या छिद्रवाल्या बादलीला वाईट वाटते.

दुसऱ्या दिवशी शेतकरी जेव्हा दोन्ही बादल्या घेऊन विहिरीकडे निघतो, तेव्हा ती गळकी बादली त्याला म्हणते, ''मी तुझी मेहनत वाया घालवते आहे. निम्मेच पाणी घरापर्यंत मी नेतेय, तर तू मला टाकून देऊन नवी छान बादली का घेत नाहीस?''

यावर शेतकरी हसून सांगतो, ''वेडी आहेस का? तुला माहीत नाहीये की, तू किती छान काम नकळत करते आहेस. नीट पाहा... आपल्या वाटेवरच्या डाव्या बाजूच्या कडेला छान-छान हिरवळ फुलली आहे. त्यात छान-छान फुले-देखील उगवली आहेत. ही डावी बाजू पाहा किती चैतन्याने रसरसलेली आहे. ही तुझ्या बाजूची डावी बाजू आहे. ही तुझ्या त्या गळक्या थेंबांची कमाल आहे. आता उजव्या बाजूला पाहा. त्या बाजूच्या बादलीतून एकही थेंब गळत नसल्याने त्या साईडला कसलीही हिरवळ उगवलेली नाही. फुले तर नाहीच नाही!!

''गेल्या अनेक महिन्यांपासून मी देवपूजेसाठी जी फुले नेतोय, ती याच डाव्या बाजूची आहेत. तुझ्यामुळेच जी फुले फुलली, त्यांचा माझ्या या देवकार्यात मोठा वाटा आहे. त्यामुळे तळाशी पडलेल्या छिद्राचे तू अजिबात वाईट वाटून घेऊ नकोस!!''

हे ऐकून ती गळकी बादली शहारली. मनापासून आनंदित झाली!!

दोष कोणात नाहीत? सगळ्यात आहेत. त्यामुळे 'मी चांगला-तो वाईट', असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही. पण त्या दोषातून जर कधी कोणाचे भले होत असेल, तर तो दोष त्या व्यक्तीने अभिमानाने मिरवावा. आधी थोडा काळ इतर लोक याला नावे ठेवतील, पण अंतिम सत्य पाहिल्यावर तेही नतमस्तक होतील!!

## सुभाषितांचा खजिना

**कर्मायत्तं फलं पुंसां बुद्धिः कर्मानुसारिणी।**
**तथापि सुधिया भाव्यं सुविचार्यैव कुर्वता।।**

माणसाची बुद्धी प्रारब्ध कर्माला अनुसरून चालते, तसंच वागण्याची त्याला इच्छा होते. आपण पूर्वी जे केले असते, त्याप्रमाणेच फळे भोगावी लागतात; हे खरे असले तरीही, माणसाने कुठलेही काम करताना नीट विचार करूनच काय ते करावे. प्रारब्धाप्रमाणे घडेल, असे म्हणून निर्बुद्धपणे वागू नये. (स्वस्थ बसू नये)

**दानं भोगो नाशस्तिस्त्रि गतयो भवंति वित्तस्य ।**
**यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवति ।**

Only in these 3 ways does all money end up : 1) Enjoyment, 2) Donation and if you don't do either of these two, then 3. Destruction. So, don't hoard your money. Either donate it or enjoy it while it lasts, because by default it is the number 3.

*मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा*
श्री. संजय आंबर्डेकर - मो. ९८२०४१७९८१

# इन्शुरन्स स्पेशालिस्ट

सुरक्षित करा आपले भवितव्य



**सर्व प्रकारच्या विमा योजना एकाच ठिकाणी उपलब्ध.**

१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा(ग्रुप इन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा



**मंगेश जांभेकर**

मोबाईल : ९८१९७ ५०९५५

Email : mangesh.jambhekar@gmail.com


Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society
M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057



संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

# सातारी पेढा शॉप

स्थापना-१९३६



**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

## पौष्टीक खाद्य भांडार

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

# ज्योती एन्टरप्रायझेस

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,
फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# शतायुषी दादा देव

एक संस्कृत वचन आहे–

**'चराति चरतोभग: ।'**

याचा शब्दश: अर्थ असा– 'जो चालतो, त्याचे भाग्यही चालते.' अर्थात भाग्य चालते म्हणजे भाग्य फळफळते. बहुतेक सर्वसामान्य माणसे 'भाग्य' म्हणजे 'पैसा' ह्याच अर्थाने घेतात; पण उत्तम प्रकृतीमुळेही तुमचे भाग्य फळफळते, अशी माणसे शतायुषी होतात. ती. दादा देव हे 'शतायुषी' झाले. त्याचे रहस्य त्यांच्या चालण्याच्या रहस्यातच आहे. आज मी कित्येक वर्षे त्यांना बघते आहे. पूर्वी गिरगावात होते; तेव्हा गर्दी कमी, पण हे चालतच सगळीकडे जायचे आणि यायचे. नंतर निवृत्तीनंतर अंधेरीला राहायला आले, तरी संध्याकाळी चालतच कुठेही जायचे. चालण्यामुळे सर्व शरीराला प्राणवायू मिळतो आणि व्यक्तीची तब्येत चांगली राहते, हा फार मोठा फायदा आहे.

दुसरा फार मोठा गुण दादा देवांचा म्हणजे– 'शांतिब्रह्म'. आजपर्यंत कुठल्याही प्रसंगात ते चिडलेले, रागावलेले, संतापलेले मी बघितले नाहीत. गिरगावात राहत असताना कित्येक लोक त्यांच्याकडे राहून गेले. फक्त वनरूम किचनमध्ये राहत होते. पण हे जराही अस्वस्थ नसायचे. अंधेरीला आल्यावर थोड्या दिवसांनी त्यांच्या पत्नी कॅन्सरने आजारी होती. पण त्यांनी, त्यांच्या मुलांनी, सुनेने सर्व शांतपणे निभावले. मनाची शांती फक्त संतांजवळच असते, तीच ती. दादा देवांजवळ आहे. अर्थातच 'देव' आडनाव त्यांनी सार्थ केले आहे.

अशा या 'शतायुषी' दादांना शुभेच्छा.

**अपर्णा भाटवडेकर**

फोन २६८४४९०६

## 'दादा देवां'चा जीवनपट

शंभर वर्षांचा कालावधी हाच मुळात फार मोठा असतो आणि १९१७ ते २०१६ या शंभर वर्षांत तर भारतात बरंच काही घडलं. आधी ब्रिटिश राजवट, मग स्वातंत्र्यलढा आणि नंतर स्वराज्य... हे सारं पाहणाऱ्या– अनुभवणाऱ्या व्यक्ती आता अगदी मोजक्याच सापडतील. आपल्या सुदैवाने आपल्या समाजात अशी एक व्यक्ती आहे– श्री. विठ्ठलराव गोविंद देव ऊर्फ दादा.



**दि. ११ डिसेंबर २०१६ रोजी विलेपार्ले येथील पु.ल.देशपांडे सभागृहात श्री. विठ्ठलराव गोविंद देव ह्यांचा १०० व्या वर्षात पदार्पणानिमित्त शतसंवत्सरीक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला.**

दादांचा जन्म ५ डिसेंबर १९१७ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील निवसर या खेडेगावात झाला. आज निवसर हे रेल्वे स्टेशन आहे. पण त्या वेळी निवसरमध्ये वीज तर सोडाच, शाळासुद्धा नव्हती. म्हणूनच शालेय शिक्षणासाठी दादा हर्चेरीला आपल्या आत्याकडे गेले. तिथे इयत्ता सहावीपर्यंत शिक्षण घेतले आणि सातवीला फायनलची परीक्षा देण्यासाठी मुंबईला मोठ्या भावाकडे आले.

दादा पाच वर्षांचे असतानाच त्यांचं पितृछत्र हरपलं होतं. आता मोठे बंधू हेच वडिलांसमान होते. बंधूसुद्धा शून्यातून विश्व निर्माण करीत होते. त्या वेळी ते मुंबईत दुधाचा धंदा करीत होते. दादा सकाळ– संध्याकाळ घरोघरी जाऊन दूध पोहोचवून आपल्या बंधूंना मदत करीत असत आणि रात्री गिरगावातील हिंद विद्यालयामधील ब्रॅडले नाईट स्कूलमध्ये शिक्षण घेत असत. असं करून दादांनी मुंबईत फायनलची परीक्षा दिली आणि ते उत्तीर्णही झाले. असेच शिक्षण पुढे सुरू ठेवून ते मॅट्रिक पास झाले. त्या काळी 'मॅट्रिक पास' ह्या शैक्षणिक अर्हतेला पीएच. डी. इतका सन्मान होता. शिवाय देव कुटुंबात मॅट्रिक उत्तीर्ण होणारी पहिली व्यक्ती होते दादा! त्यामुळे अक्षरश: गावभर पेढे वाटले होते.

असे आनंदाचे क्षणच जीवनात कष्ट करायला उभारी देत असतात. दादांनी खरंच खूप कष्ट केले. परिस्थितीशी जुळवून घेतले. खेड्यातील कर्मठ वातावरणात बालपण व्यतीत केलेले दादा एकदम मुंबई शहरात आले; तेव्हा मुंबई जरी आजच्या इतकी प्रगत सुधारित नसली, तरी निवसरातील जनजीवन व मुंबईतील जनजीवन ह्यात तफावत खूपच होती. पण दादांनी मुंबईतील जीवनपद्धती स्वीकारली.

दादांनी प्रथमत: हायकोर्टात नोकरी केली. नंतर एका ऑईल कंपनीत नोकरी केली. त्यानंतर 'बॉम्बे म्युच्युअल'मध्ये त्यांना नोकरी मिळाली. इथे त्यांच्या वैयक्तिक जीवनात स्थैर्य आले. 'बॉम्बे म्युच्युअल'चे १९५६ मध्ये राष्ट्रीयीकरण होऊन 'एलआयसी'त रूपांतर झाले. दादांनी १९७७ मध्ये सेक्शन हेड म्हणून सेवानिवृत्त होईपर्यंत एलआयसीत नोकरी केली.

एलआयसीतील सहकाऱ्यांनी मिळून स्थापन केलेल्या सत्यदर्शन हाउसिंग सोसायटीत ते १९८३ मध्ये राहायला आले. स्वत:च्या मालकीचे घर असावे, ही त्यांची इच्छा पूर्ण झाली. व्यक्तिगत जीवनात दादा अत्यंत समाधानी आहेत. त्यांचे तीन मुलगे, दोन मुली आपापल्या संसारात सुखी आहेत. सर्वांत जास्त समाधानाची गोष्ट म्हणजे दादांचे मुलगे, सुना, नातवंडं दादांना उदंड प्रेम व आपुलकी देताहेत. त्यांची मन:पूर्वक देखभाल करताहेत. दिनांक ११ डिसेंबर २०१६ रोजी साजरा झालेला दादांचा शतसंवत्सरी सोहळा हे त्याचंच द्योतक आहे.

दादांना विनम्र अभिवादन!

**हेमांगी जोशी (देव)**

आणि समस्त देव परिवार

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)





जिथे सकाळ पक्ष्यांच्या गोड किलबिलाटाने जागी होते, सगळे ऋतू आपलं सौंदर्य मुक्तपणे उधळतात, अशा पलाश बुलेव्हर्ड मध्ये आपलं स्वागत !
पुण्यातील निसर्गरम्य पिरंगुट येथे तयार होत असलेल्या या १ व २ बीएचकेच्या गृहप्रकल्पात तुम्हाला अनुभवता येईल तुमचं रम्य बालपण आणि आधुनिक सुख - सुविधांचा सुंदर मेळ! इथल्या बुलेव्हर्डच्या गार सावलीत कट्ट्यावरच्या गप्पाही छान रंगतील !

आयुष्याचा आनंद पुरेपूर लुटायचा तर तो इथेच !

**Amenities**

• Club House • Multi-Purpose Hall • Gym • Party Lawn • Ganesh Temple • Senior Citizens' Park • Landscape Garden • Jogging Track • Kids' Play Zone • Indoor Games

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

enquiry@javdekars.com | www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road, Kothrud, Pune-411038, India. **Tel.: +91-20-6620-8000**

Site Address: Pirangut Valley, Gat No. 510, Behind Aditya Nisarga, 2 kms before Pirangut, Pune, India. **Mob.: +91-85549 82916**

www.9studioworks.com


BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:
संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३०

To,